# गंध

सुवर्णा लेले

# गंध

## सुवर्णा लेले

ई साहित्य प्रतिष्ठान

# गंध (कथासंग्रह)

**लेखक: सुवर्णा लेले**
22 क्वीन्सबरी गेट, न्यूकॅसल,
युनायटेड किंगडम
संपर्क क्रमांक : +९१ (९९२०१२६७६३) / +४४ (०७४४०३८४४०९)
ई मेल : lele.suvarna@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत
400604
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : १२ फ़ेब्रुवारी २०२५

©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



नमस्कार ,

**मी सुवर्णा लेले**.

मला लहानपणा पासून गोष्टी ऐकायला फार आवडतात. तसंच कधीतरी  छोट्या कविता करण्याची पण आवड आहे. वेगवेगळया प्रकारचे आवाज काढून गोष्ट सांगायला मला खूप आवडतं.  एखाद्या गोष्टीची संकल्पना माझ्या डोक्यात आली की मी ती लगेच रेकॉर्ड करते. रेकॉर्ड करता करताच मला गोष्ट सुचते.

ह्या कथा संग्रहातल्या सगळ्या गोष्टी मी आधी ऑडिओ फाइल्स मध्ये रेकॉर्ड केलेल्या आहेत. मग त्या वर्ड फाईल मध्ये कन्व्हर्ट केल्या आहेत. त्यामुळे या गोष्टी काही फार मोठ्या नाहीयेत. रेकॉर्डिंग करत असल्यामुळे मला कमी वेळात जेवढं सुचतं ते मी रेकॉर्ड करते, म्हणून कदाचित गोष्टी लहान आहेत. अशा प्रकारचा हा माझा पाहिलंच प्रयत्न आहे.

मला  चित्रपट, नाटके बघायला, गाणी ऐकायला ही आवडतात , लोकांना भेटून गप्पा मारणे हा देखील माझा छंद आहे.

टीम ई साहित्यचे मनापासून धन्यवाद. ई साहित्य प्रतिष्ठाना मुळे माझ्या सारख्या नवीन लेखन करणारांना खूप छान व्यासपीठ मिळाले आहे.


सुवर्णा लेले

संपर्क क्रमांक : +९१ (९९२०१२६७६३) / +४४ (०७४४०३८४४०९)

ई मेल : lele.suvarna@gmail.com

22 क्वीन्सबरी गेट, न्यूकॅसल, युनायटेड किंगडम

## अर्पणपत्रिका

**माझे हे पहिले पुस्तक मी माझ्या आई बाबांना**

**आणि माझ्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीसं**

**कृतज्ञपणे समर्पित करत आहे !!!**

# कथानुक्रम

१. माय फ्रेंड सांता

२. व्हॉट'स अँप बाप्पा

३. दोन शब्द

४. गंध

५. देविका

६. अभिप्राय

७. एक रिप्लाय

८. मनाची नाती

**या संग्रहातील सर्व कथा ,सर्व पात्रे, प्रसांग आणि स्थळे पूर्णपणे काल्पनिक आहेत कोणाही व्यक्तीशी, वास्तविक घटनेशी साम्य आढळले तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

# माय फ्रेंड सांता

बरं सगळं घेतलंय ना सामान. मेन पासपोर्ट ते जास्त महत्त्वाचे घेतलेत ना? का विसरलात घरी? अगं घेतलंय सगळं. तू काही टेन्शन घेऊ नकोस.आणि एक गोष्ट म्हणजे टर्मिनल २ ला फ्लाइट लॅन्ड होईल. बाबा हा ड्रायव्हरचा नंबर आहे. मी त्यांच्या कॉन्टॅक्ट मध्ये असेनच आणि तुम्ही पण मुंबईला लॅन्ड झालात की त्यांना एकदा फोन करा. कारण काय? क्रिसमस मुळे खूप गर्दी असेल. उगीच तुम्हाला खूप वेळ थांबत बसायला नको. बर हा नंबर तर सेव करा. अगं करतो फ्लाइट मध्ये बसल्यावर करतो बाबा तुम्ही पण हरवला तर पंचाईत नाही का होणार? मी तुम्हाला मेसेज करून ठेऊ का? अरे देवा. नेमकी फोन बॅटरी लो झाली माझी. आत्ता हा नंबर तुम्हाला दिलाय तो तुम्ही नक्कीच सेव्ह करा हा. बरं चल बाय बेटा मुलांना पुष्करला सांग विचारलंय आम्ही. आम्ही पोचल्यावर तुला फोन करूच.

ठीक आहे चल बाय निताला बाय करताना परतताना आमच्या दोघांचेही मन भरून आले होते. येणारच, सहा महिने मुलीबरोबर नातवंडांनी बरोबर कसा वेळ गेला कळलंच नाही. आता मुंबईत गेल्यावर परत तेच रुटीन आणि तोच एकटेपणा असा विचार करत आम्ही दोघेही विमानात बसलो. लगेच मेधा मला म्हणाली, छान झाली ना हो या वेळेला ट्रिप. किती नवीन नवीन लोक भेटली.

नाही बरे. मी आता एकटी नाहीये. किती तरी नवीन नवीन मैत्रिणी झाल्यात तिच्या. आता तिची काळजी करायची गरज नाही. हो ग खरंच माणसं ही हवीच. कधी कोणाला कशी मदतीची गरज लागेल काही सांगता येत नाही. बरं असू दे निताने त्या ड्रायव्हरचा नंबर दिलाय. तो पहिले सेव करा बघू. चष्मा कुठाय तुमचा? अगं करतो. मला दिसतं. मी करीन. तू टेन्शन नको घेऊ. नाही माझ्यासमोर करा. आत्ता बरोबर करतो असं म्हणून मी नंबर सेव केला आणि काही तासातच आम्ही मुंबईला लॅन्ड झालो.

सगळ्या फॉर्मेलिटी कम्प्लीट करून आम्ही बाहेर आलो. बाहेर आल्या आल्या मेधा मला म्हणाली, अहो मी निताला मेसेज केलाय. आम्ही सुखरूप लँड झालो आहोत आणि आता टॅक्सीची वाट बघत आहोत. उद्या सकाळी बोलूच. वा. बरं झालं म्हणजे आता तिला टेन्शन नाही आणि जागंत बसायला नको. हो ना? आज क्रिसमस मुळे किती गर्दी आहे? बरं एक काम करा ना. त्या ड्रायव्हरला फोन लावा आणि मेसेजही करून ठेवा. त्याला विचारा. किती वेळ आहे अजून? हो लावतो लावतो. अरे फोन तरी होतोय उचलत का नाहीये? बरं मेसेज करून ठेवतो. तुम्ही नम्बर बरोबर सेव्ह केलात ना? एक तर चष्मा लावला नव्हता. काय ती चष्मा लावायची लाज वाटते. मला तर काही कळतच नाही बाई. अगं केलाय नीट. आता तो माणूस फोन उचलत नाही ह्याला मी काय करणार? तुम्ही परत परत लावा सारखे लावत रहा. हो तेच करतोय. बापरे! अर्धा तास झाला. अजून त्या माणसाचा फोन नाही आला. हो. मी पण तोच विचार

करतोय आणि आता नवीन टॅक्सी बुक करणं म्हणजे कठीण दिसतंय. क्रिसमस मुळे आता टॅक्सी पण येणार नाहीत. मेधा खूप कंटाळली होती आणि वैतागली पण होती. सगळा राग माझ्यावर काढत होते. अर्थात तिचा तरी काय दोष होता? एवढा प्रवास करून थकली होती ती. मी पण थकलो होतो. वाट बघत होतो. त्या माणसाचा कधी फोन येईल. तेवढ्यात फोन वाजला. मी जरा वैतागूनच फोन उचलला. हॅलो. अहो काय हे. किती फोन लावले तुम्हाला? आणि किती मेसेजेस केले? कसलीच उत्तरं दिली नाहीत तुम्ही. केव्हापासून थांबलोय आम्ही इथे. अर्धा पाऊण तास झाला. बरं आता आहात तरी कुठे? तितक्यात समोरून कोणीतरी बोलायला लागले  हॅलो काका थांबा थांबा. अहो तुमचा काहीतरी गैरसमज होतोय.

मी काही कुठला ड्रायव्हर वगैरे नाही. हा माझा पर्सनल नंबर आहे आणि तुमचे खूप मिस कॉल येऊन गेले. म्हणून मी जनरल कॉल बॅक केला की कोणी मला फोन लावला. अहो असं कसं? हा तर ड्रायव्हरचा नंबर मला निताने दिलाय. काका, सॉरी. पण मी कुठल्या निताला वगैरे ओळखत नाही. आणि मी तर ड्रायव्हर तर अजिबातच नाही. सॉरी. तुमचे खूप मिसकॉल दिसले म्हणून फोन केला. तुम्ही बहुतेक चुकीचा नंबर सेव्ह केलेला दिसतोय. तुम्ही त्या कोण आहेत? निता त्यांच्याशी एकदा चेक करा. पण असं कसं झालं? मी तर बरोबर नंबर सेव्ह केलाय.  सॉरी, तुम्हाला जरा त्रास दिला. आम्ही काही तरी बघतो.

थॅंक्स. असं म्हणून मी फोन बंद केला. मी मेधा कडे बघितलं. मेधा प्रचंड वैतागली होती. मला म्हणाली, अहो हे काय हे. नंबर चुकीचा आहे. तो ड्रायव्हरचा नंबर नाहीच. आता काय करायचं? मला तरी माहितीये. तुम्ही काही ना काही तरी गोंधळ घालतात. बरं आता एवढ्या रात्री निताला फोन करण्यात पण पॉईंट नाही. तिची झोपमोड नको. बघूया किती पैसे घेतील तेवढे घेतील.

कोणी टॅक्सीवाला येतोय का? बऱ्याचशा टॅक्सी ह्या ऑलरेडी प्री बुकिंग केल्या होत्या. त्यामुळे आता नवीन टॅक्सी येण्याची काही सोयच नव्हती. काय करूया काही कळत नव्हतं. तेवढ्यात परत फोन वाजला. क्षणभर वाटलं नीताने कॉल केलाय की काय? बघतो तर त्या मगासच्या नंबरवर फोन होता. मी फोन उचलला आणि म्हटलं, हॅलो, नमस्कार काका. आपण मघाशी बोललो होतो. काका, मला एकंदर तुमच्या बोलण्यावरून लक्षात आलंय की तुम्ही एअरपोर्टवर आहात आणि तुमचा काहीतरी गाडीचा प्रॉब्लेम वगैरे झालेला दिसतोय. हो बरोबरे आम्ही एअरपोर्ट वरच आहोत आणि आता टॅक्सीच्या शोधात आहोत. आणि आज क्रिसमस मुळे सगळ्या टॅक्सी पण बिझी आहेत. रस्त्यावरही ट्रॅफिक आहे.

बघू काहीतरी सोय झाली तर. तसही आम्हाला मुलुंड जायचेय म्हंटल्यावर ट्रेन ने जाणे जरा कटकटीचे होईल. बघूया. टॅक्सी मिळेल अशी आशा ठेवतो. तुमची हरकत नसेल तर मी टॅक्सी शोधायला तुम्हाला मदत करू शकतो. अहो कशाला? तुम्हाला कशाला त्रास? आपली काही ओळख पण नाही हो काका.

अगदी मान्य. आपली काहीच ओळख नाही. पण माझ्यावर विश्वास ठेवा. मी थोडीशी मदत करून बघतो तर टॅक्सी मिळाली तर तुम्हालाच मदत होईल. बरं चालेल. मला ह्याच नंबरवर परत फोन करा. असं म्हणून मी फोन ठेवला. मेधा लगेच मिळाली. कोणाचा फोन होता. अगं त्या मगासच्या माणसाचा. त्यांचं नाव वगैरे विचारलं नाहीत का? नाहीत विचारलं. ते म्हणत होते की मी तुम्हाला टॅक्सी शोधायला मदत करतो. अरे वा. बरंच झाले ना मग . आजकाल आपल्याला हे काहीच समजत नाही ना? ह्या जरा तरुण मंडळींना पटापट सुचतं. पण बरं बघू. काही झालं तर बरं होईल.

इतक्यात परत फोन वाजतो. समोरची व्यक्ती म्हणते, हॅलो काका, अहो टॅक्सी बुक झालीये. एक अर्ध्या तासात येईल अर्धा तास जरा तुम्हाला सहन करायला लागेल. बरं मी तुमचा फोन नंबर त्या माणसाला दिलाय. तो तुम्हाला फोन करतील. चला तुमचं टेन्शन गेलं सुखरूप घरी जा आणि पोहोचलात की मला कळवा बाय. असं म्हणून त्या माणसाने फोन ठेवून दिला. आणि खरंच १० मिनिटांत मला फोन आला. हॅलो सरजी, आपण टॅक्सी बुक केली आहे ना ? तुम्ही टर्मिनल २ ला आहात ना ? मी येतो २० मिनिटांत. तुम्ही तयारच रहा.असं म्हणून टॅक्सीवाल्याने फोन ठेवला.मेधा आता खुश झाली होती. मला म्हणाली, चला फायनली टॅक्सी येईल आणि आपण घरी जाऊ. कंटाळा आलाय. प्रवासाने अगदी थकायला झालंय. हो ग. समजू शकतो.

तेवढ्यात टॅक्सी आलीच. आम्ही टॅक्सीत सामान ठेवलं आणि टॅक्सीवाल्याला म्हटलं. चला निघूया. हा सर निकलते है बाहर इतना ट्रॅफिक है

और आप तो मुलुंड साईड जाना  है वहा तो इतना ट्रॅफिक है. सरजी, आपने तो पहले टॅक्सी बुक करनी थी  अभी आपको तो जादा पैसे पडेगे . लगेच मेधा म्हणाली, अरे हो पडेल जो पडेल.  क्या बोलू? हे आमचे आहेत ना हयांनी नंबर सेव केलाच नाही टॅक्सीचा. आणि मग हमको बहोत प्रॉब्लेम हुवा तो इसलिये हमने  दुसरा टॅक्सी बुक किया.  अरे हा भाईसाब जिसने ये टॅक्सी बुक किया  है उसका नाम बोल सकते हो क्या? . सॉरी सर कूच पता नहीं हमे बुकिंग कॉल्स एजन्सीसे आते है.  तो हमे तो नाम और  नंबर कहा से पता होगा. सॉरी सर . ठीक है कोई बात नहीं. चला फायनली घरी आलो. घरी आल्यावर सामान सगळं लावून ठेवलं. अंघोळी केल्या आणि निवांत बसलो. मेधाने गरमागरम चहा केला. चहाचा घोट घेतल्यावर ती खरच अंगात तरतरी आली.

इतक्यात निताचा फोन आला. मी निताला सगळा प्रकार सांगितला. निता म्हणाली, अरे बापरे! मला काहीच कल्पना नव्हती. मला पण त्या एजन्सीकडून नंबर मिळाला होता. त्यामुळे काहीच आयडिया नाही. बापरे! तुम्हाला खूपच प्रॉब्लेम फेस करायला लागले.  बायदवे, ज्या माणसाने तुम्हाला हेल्प केली त्यांना कळवलं का? आणि त्यांचं नाव काय आहे. अगं हो त्यांना कळवायचं राहिलं. बरं बरं. कळवतो त्यांना. चल बोलू नंतर. मी विचार केला की एवढ्या सकाळी सकाळी फोन नको लावायला म्हणून एक व्हॉट्सअप मेसेज केला. गुड मॉर्निंग. मी सुधीर माने. काल आपली खूप मदत झाली. त्यामुळे आम्ही सुखरूप घरी येऊ शकलो. त्याबद्दल खूप सारे धन्यवाद. तुमची खूप मदत झाली. आमच्यामुळे तुम्हाला जो रात्री त्रास झाला त्यासाठी सॉरी. तुमचा दिवस चांगला

जावो. जमलं तर तुम्ही तुमचे नाव कळवले तर बरं होईल. असा मेसेज मी केला. तेवढ्यातच अर्ध्या तासात लगेच रिप्लाय आला.

गुड मॉर्निंग काका. छान वाटलं ऐकून की तुम्ही सुखरुप घरी पोचलात ते. अहो त्रास कसला? असं समजा की मी माझं कर्तव्य पार पाडलं. बरं माझं नाव जाणून घ्यायची आपणास इच्छा आहे. पण खरं सांगू का? नाव कळलं किंवा नाही कळलं तरी काही फरक पडणार आहे का? तसही कोणीतरी हुशार माणसाने म्हटलेलंच आहे ना? नावात काय ठेवलंय? असा मेसेज त्या मुलाने माणसाने केला होता. मी तो मेधाला वाचून दाखवला. मेधा म्हणाली, जरा विक्षिप्त दिसतोय. असं काय अगदी. त्याचे  नाव अगदीच स्पेशल आहे का? सांगायला काय होतंय? अगं जाऊदे  प्रत्येकाची इच्छा. आपल्याला तरी काय फरक पडतोय? राहू दे ना आपण त्याचं नाव सेव्ह करूया पंचवीस डिसेंबर. कसं वाटतंय? चांगलंय चांगलंय मेधा म्हणाली.

हळू हळू पंचवीस डिसेंबर आणि आमच्या दोघांची गट्टी होऊ लागली होती.तो बरेच वेळा मेसेज करायचा, विचारायचा, कसे आहात? काय चाललंय? काही वेळेस फोन पण करायचा. का कुणास ठाऊक त्याच्या आवाजात एक वेगळाच आपलेपणा होता. त्याच्याशी कधी बोललो ना की एक वेगळाच कॉन्फिडन्स यायचा. काहीतरी विलक्षण माणूसच होता तो. खरंच अशी माणसं भेटत नाहीत आजकाल. त्याला आता आमच्याबद्दल बऱ्यापैकी माहिती झाली होती. पण आम्हाला त्याच्याबद्दल काहीच माहिती नव्हतं. साधं त्याचं नावही माहिती नव्हतं. एवढं मात्र नक्की होतं की तो एक चांगला माणूस आहे.

बरेच दिवस झाले आम्ही आता बऱ्यापैकी रुळलो होतो. असाच एकदा मी आणि मेधा रात्री वॉकला म्हणून बाहेर पडलो. गप्पांच्या नादात आम्ही एका भलत्याच रस्त्याला लागलो. जो अगदी निर्मनुष्य रस्ता होता. कोणीच नव्हतं त्या रस्त्यावर. तेवढ्यात एक भरघाव गाडी आली आणि त्या गाडीचा धक्का मला जोरात बसला. एवढा जोरात की मी अक्षरशा बेशुद्ध होऊन खाली पडलो. घडलेला सगळा प्रकार बघून मेधा एकदम घाबरून गेली. तिला काही सुचतच नव्हतं. ती बघत होती की कोणी मदतीला जवळपास आहे का? पण कोणीच मदत करायला नव्हतं तिथे. ना रिक्षा ,ना माणसं. इतक्यात माझ्या खिशातला मोबाईल वाजला. मेधा पटकन जवळ आली. तिने मोबाईल काढला. तिला वाटलं निताचा फोन असेल. पण बघते तर काय? पंचवीस डिसेंबर कॉलिंग बघून मेधाला एकदम बरं वाटलं. तिने पटकन फोन उचलला. ती म्हणाली, हॅलो, हॅलो काकू. काय झालं? एवढ्या घाबरल्या  का आहात ? अरे काय सांगू हे बेशुद्ध पडलेत रस्त्यावर कोणीही मदतीला नाहीये. मला काहीच कळत नाहीये. अचानक एक गाडी आली आणि यांना तिचा  धक्का लागला आणि ते बेशुद्ध पडले. आम्ही बोलता बोलता एका भलत्याच रस्त्याला आलोय. बरं काकू थांबा. काही टेन्शन घेऊ नका. मला जरा जवळपासच्या काही गोष्टी सांगू शकाल का? कुठे आहात? नक्की कुठे आहात? अरे मुलूंड मध्येच आहोत पण हा रस्ता काही कळत नाहीये.

धड इथे उजेड पण नाहीये. हा समोर एक विनीत झेरॉक्स  काहीतरी असं दिसतंय. ठीक आहे काकू. तुम्ही तिथेच थांबा. काहीही गडबड करू नका आणि

तिथून हलू पण नका. असं म्हणून पंचवीस डिसेंबर ने फोन ठेवला आणि वीस मिनिटांत ऍम्ब्युलन्स आली. आम्ही हॉस्पिटल मध्ये गेलो. डॉक्टर मेधाला म्हणाले, मॅडम, तुम्ही अगदी वेळेत आलात. नाहीतर यांना ब्रेन हॅमरेज झालं असतं आणि ह्यांच्या जीवाला धोका असता. आता हा सगळा धोका टळला आहे. त्यामुळे रिलॅक्स राहा. मेधाचे टेन्शन जरा कमी झालं. काही तासात मी पण शुद्धीवर आलो. मी शुद्धीवर आल्यावर मेधाने घडलेला सगळा प्रकार सांगितला. मेधा म्हणाली, खरच काही ना काही तरी कनेक्शन आहे आपल त्या पंचवीस डिसेंबर शी. बघा ना मागच्या वेळेला आपण सुखरूप घरी आलो ते त्याच्या मुळेच. आत्ता तुम्ही पण हे बरे आहात हे त्याच्या मुळेच. कोणतीही अपेक्षा न ठेवता किती प्रेमाने आणि आपुलकीने करतो तो. आजकालच्या काळात अशी माणसं मिळणं फार कठीण असतं. आणि मला अगदी माझा अभिमान वाटतोय की असा एक मनुष्य आपल्या आयुष्यात आहे, जो कुठल्या ना कुठल्या तरी रूपात खंबीरपणे आपल्या पाठीशी उभा आहे. हो ग. अगदी खरं बोलतेस तू. अहो तुम्हाला एक सुचवू का ? तुम्ही हे जे त्याचं नाव पंचवीस डिसेंबर सेव केलं ना त्याच्यासाठी मला एक योग्य नाव सुचलं आहे. काय ग काय? नाव आहे "सांताक्लॉज " तो आपल्याला पंचवीस तारखेला भेटला. अगदी सांताक्लॉज सारखाच. सतत लोकांचा विचार करणारा कुठल्या ना कुठल्या रूपात लोकांना आनंद देणारा आणि आपला पंचवीस डिसेंबर पण अगदी असाच आहे सांताक्लॉज सारखा. येस मॅडम. एकदम परफेक्ट नाव शोधल आहेस तू त्याच्यासाठी. आत्ता लगेच सेव करतो माय फ्रेंड सांता.

# व्हॉट'स अँप बाप्पा

गणपती बाप्पा आणि मूषक दोघेही शतपावली करत असतात. इतक्यात अरे अरे अरे इतके मेसेजेस कोण करतंय बघ रे जरा. कोण मेसेज करतंय ?हो देवा बघतो.मूषक लगेच मोबाईल चेक करतो आणि देवाला म्हणतो देवा देवा. अरे नारदमुनींनी मेसेज केलेत ते असे म्हणतायत की आता नुकतेच आपण पृथ्वीतलावर परत आला आहात. आपल्या ह्या दहा दिवसांच्या प्रवासाबद्दल रिव्ह्यू द्या आणि लेटेस्ट फोटोही द्या. म्हणजे आम्ही वेबसाईटवर अपलोड करू. हो का मग एक काम करूया. आपला तो भक्तगणांची व्हॉट्सॲप ग्रुप आहे ना? त्याच्यात खूप लोकांनी फोटो शेयर केलेत. त्याच्यातले काही चांगले फोटो घे आणि नारदाला पाठव आणि रिव्ह्यूज तर म्हणशील तर तू लिहून घे. मी सांगतो तुला रिव्ह्यू लिही. दर वर्षी प्रमाणे या वर्षी ही पृथ्वीतलावरचा. लोकांनी माझं स्वागत अगदी जोरदार केलं. मनापासून खूप प्रेमाने. छान वाटलं. छान वाटतं म्हणूनच तर मी दरवर्षी येतो परत परत दहा दिवस त्यांना सगळ्यांना भेटायला. पण खरं सांगू का कुणास ठाऊक आता पुर्वीसारखी मज्जा येत नाही रे. मी एंजॉय करतो पण जे पुर्वीचे दिवस होते ना जेव्हा घरातले सगळे एकत्र येऊन माझी वाट बघायचे. माझ्यासाठी काही ना काही तरी वेगवेगळे पदार्थ करायचे. आताही करतात. पण त्यांची काय म्हणतात ते. स्टाईल बदलली रे. अरे साध बघ ना. पूर्वीच्या काळापासून माझा आणि गौराई चा पण पोशाख किती साधा असायचा. आणि आता ते काहीतरी असतं ना? म्हणजे डिझायनर आणि

काहीतरी ते कस्टमाईज कपडे वगैरे . वाटतात छान. खरं सांगू का? अरे पण दहा दिवस टोचतात रे ते फार असे कपडे घालायची सवय नाही ना रे मला .

पण आम्ही काही बोलत नाही आणि तुमच्या प्रेमापोटी सगळं सहन करतो. काही वेळेस असं वाटतं की जणू काही स्पर्धाच चालू आहे. मला किती नटवतील. किती सोन, किती चांदी, हिरे, मोती काय घालू आणि काय नको. खर सांगू का मला याची काहीच गरज नाहीये आणि अपेक्षा पण नाहीये की तुम्ही माझ्यासाठी असं करा तसं करा. मला छान तुमच्या घरी बोलवा आणि डेकोरेशन वगैरे पण करू नका. माझी काहीच अपेक्षा नाही. मला फक्त प्रत्येकाच्या घरी जायचे आणि बघायचे. तुम्ही कसं जगता कसं वागताय. मला मज्जा येते खूप हे सगळं बघायला तुमची छोटी छोटी मुलं, बोबड्या आवाजात विचारलेले त्यांचे प्रश्न, तुम्ही एकत्र गायलेली भजन, कीर्तन, घरच्यांनी एकत्र येऊन केलेले गोड पदार्थ यांच्यात मला जास्त रस आहे मला. ते तुमचे आजकाल काय फोटो समारंभ ह्याच्यात तर अजिबात रस नाही. रादर माझी खूप चिडचिड होते. कोणी माझा फोटो काढायला लागलं तर अरे माझ्या कडे बघा. माझ्याशी गप्पा मारा ते सोडून तुमचे आपले फोटो काढण्यातच वेळ घालवता मला भेटायला येताय का फोटो काढायला? मला कधी कधी अशी भीती वाटते की हे सगळं कृत्रिम होत चाललंय. तुम्ही मला बोलवता खरं प्रेमाने पण ते पण कृत्रिम होतं की काय असा मला आता प्रश्न पडायला लागलाय. सगळ्याच पद्धतींमध्ये अगदी बदल झालेत. आता मला खरं जास्वंदीचे फूल जेव्हा कोणी वाहिलेंना तर मला एवढा प्रचंड आनंद होतो.

मला आता कंटाळा आलाय त्या प्लास्टिक च्या डेकोरेशन चा प्लास्टिकच्च्या फुलांचा. आणि सोनं चांदी. नको रे बाबा. कोणीही माझ्यासाठी काही करू नका. अरे त्या फुलांना सुवास नसतो. मलाच वासाची एवढी सवय झालीय ना? अगदी वीट येतो या प्लास्टिकच्च्या सगळ्या गोष्टींचा. बरं एक चांगलंय. अजून कोणी प्लास्टिकचे मोदक मला दाखवले नाहीयेत. नैवेद्य म्हणून काही दिवसांनी तसं पण होईल याची पण भीती वाटते. मोदकांच्या वरून आठवलं या ट्रीपमध्ये मी एक पहिले लोकांनी कित्ती प्रकारचे मोदक केले. खरंच बघून खाऊन कौतुक वाटलं. पण नंतर कळलं की माझ्यासाठी केले होते हे. पण जास्त लोकांना त्याच्यात रस होता. ते काहीतरी इन्स्टाग्राम, इन्स्टाग्राम असतं ना त्याच्यावर. ती म्हणे रील करण्यासाठी. अरे माझ्यासाठी केलेत तर मला पोटभर खाऊ तरी द्या .तिथे पण तो फोटोमध्ये आलाच. मला सांगायचे आहे काय? एकतर मी येतो तो बरोबर एक वर्षानी म्हणजे मी रोज तुमच्याबरोबर नसतोच तर मला जरा वेळ द्या. माझ्याशी गप्पा मारा. फोटोत काय ठेवलंय फोटो तुम्ही रोजच काढता आणि छानच दिसता की. थोडं डेकोरेशन कमी करा. चार पदार्थ कमी करा. मला तुमचा सगळ्यांचा वेळ हवाय. आणि माझी अशी इच्छा आहे की तुमचे मित्र मैत्रिणी जेव्हा आपल्या घरी येतात ना तेव्हा त्यांना पण थोडा वेळ द्या. जसं तुमच्या बालपणी मी तुमच्या आजोबांकडे असायचो. तुमच्या किती गोड आठवणी आहेत माझ्या बद्दलच्या तशा तुमच्या मुलांच्या असू देत ना. का त्यांनी त्यांच्या मुलांना अशा आठवणी सांगायच्या. आपल्याकडे दरवर्षी गणपती बाप्पा येतो आणि तो आला की आम्ही भरपूर

फोटो काढतो, दहा दिवस फक्त आम्ही फोटो काढत असतो, वेगवेगळे कपडे घालतो, वेगवेगळे पदार्थ करतो, पदार्थांबरोबर फोटो काढतो. त्यांना अशा आठवणी  ठेवू नका. ही एक नम्र विनंती आहे.

पूर्वी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या. हे ऐकलं की मला असं वाटायचं हे वर्ष कधी जातंय आणि मी परत कधी येतोय तुमच्या कडे. आता हे ऐकलं ना की माझ्या पोटात गोळा येतो. अरे बापरे! पुढच्या वर्षी परत यायचे आणि परत खूप सारे फोटो काढायचे आहेत. तुम्ही मला फक्त फोटोसाठी बोलवत नाही आहात ना? पुढच्या वर्षी लवकर या असं.  मला अगदी मान्य आहे. काळाप्रमाणे पुढे जायला पाहिजे. सगळ्या गोष्टी चा आनंद घ्यायला पाहिजे. पण खरं सांगू का कुठेतरी त्याला मर्यादा यायलाच पाहिजे. आनंद घ्या. पण तो एक काही क्षण घ्या. रोजचंच तेचतेच तेच तेच तेच झालं की कंटाळा पण येतो. चला छान वाटलं मात्र तुमच्या सगळ्यांकडे येऊन काय आशीर्वाद देऊ तुम्हाला. असेच दरवर्षी मला बोलवा. खूप सारे फोटो काढा. वेगवेगळ्या रील करा आणि त्या पोस्ट करा. चल. लिहिलास रिव्ह्यू. हो देवा. लिहिला. आत्ताच्या आत्ता लगेच नारदांना ते पोस्ट करतो. अरे व्वा! गणपती बाप्पाने लगेच रिव्ह्यू आणि फोटो पाठवलेले आहेत. चला आत्ताच्या आत्ता वेबसाईटवर ती अपलोड करतो व एक पेज तयार. आणि हा कुणाचा मेसेज? वा वा. देवीचा पण मेसेज आला वाटतं. काय लिहिलंय? बरं चला आता हे दुसरं पेज पण अपलोड करतो. नवरात्रीचे कलर स्कीम कमिंग सून.

# दोन शब्द

काही म्हण शामा आज खूप दिवसांनी बुवांचं कीर्तन ऐकलं. खरंच मन अगदी प्रसन्न झालं अग पण तुझं लक्षच नव्हतं. तू त्या एका छोट्या मुलीशीच बोलत होतीस. हो ना? हो ती मुलगी किती गोड होती ना? हो. काय नाव ग राधा कर्णिक. तिला मी केलेला मुगाचा हलवा एवढा आवडला. सारखी येत होती मला. म्हणत होती आजी मला थोडासा खाऊ देतेस. मला अगदी आपल्या राघवची आठवण आली. हो राघवला ही खूप आवडतात ना  तुझ्या हातचे सगळे पदार्थ. अगं तू ते काय म्हणतात आजकाल? हा तू खरंच मास्टरशेफच आहेस. मज्जा नाही करत खरंच सांगतोय. तुम्ही पण मास्टर शेफ वगैरे. काय साधी गृहिणी आहे हो. मी जसा जमेल तसा स्वयंपाक करते. नाही नाही तसं नाही. स्वयंपाक उत्कृष्ट करतेस आणि तू एवढं प्रेमाने करतेस ना सगळ्यांसाठी ते महत्त्वाचं. हो हो. पुरे झालं कौतुक. मिस्टर बर्वे. उशीर होतोय घरी जाऊया ना. हो जाऊया चल. मग दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे मंदिरात गेलो. आम्हाला बघून ती कालची मुलगी काय बरं? हाहा. राधा पटकन माझ्याकडे धावत आली आणि म्हणाली, आजी  तू हलवा आणला आहेस का ग? मला दे ना थोडासा. शामा हसतच म्हणाली. नाही गं बाळा. आज नाही आणला हलवा. राधा, ऐ राधा इकडे ये बाळा आई इकडे ये ना. ही बघ हीच ती आजी  हिने काल तो हलवा

केला होता. नमस्कार मी आरती कर्णिक. राधाची आई. नमस्कार मी शामा बर्वे आणि हे अतुल बर्वे. आमचा मुलगा अमेरिकेत असतो. इथे आम्ही दोघच राहतो. हो का? अहो तुमचा हलवा. राधाला एवढा आवडला. घरी जाऊन बाबांना आजीला सगळ्यांना सांगत होती की एक आजी होती मंदिरात तिने इतका छान हलवा केलेला. मला आज दुपारीच म्हणाली, आई, आज आपण परत जाऊया. मंदिरात ती आजी नक्की येईल आणि तू तिला विचारलं की तो हलवा कसा करायचा ते मला सांगाल का? कसा करायचा? कारण खूप कठीण असतो तो हलवा करणं.

मी करून बघीन. तुम्ही कशाला? मी करीन की परत. फार गोड आहे तुमची मुलगी. राधा साठी मी नक्की करीन फक्त नाआत्ता मला जमणार नाही. आम्ही दोघ जण मुलाकडे जातोय. एक दोन महिन्यांसाठी आल्या नंतर मी नक्की तुम्हाला करून देईन. तुमचा अॅड्रेस देऊन ठेवाल का मला? आणि फोन नंबरही द्या. म्हणजे मी तुम्हाला कॉन्टॅक्ट करेन. हो नक्कीच. दोघांनी आपापले फोन नंबर आणि पत्ते शेयर केले. मग आम्ही दोघ दोन महिन्यांसाठी राघवच्या कडे गेलो. अमेरिकेत मस्त दोन महिने धमाल मुलांबरोबर राहायचं सुख काही वेगळंच असतं. आणि राघव तर एवढा आतुरतेने आमची वाट बघत असतो ना की आई कधी येणार आणि आईच्या हातचे पदार्थ कधी खाणार. राघव चे मित्र पण शामाचं कौतुक करत असतात. शामा आहेच अशी सतत दुसऱ्याचा विचार करणारी. दुसऱ्यांना आनंद कसा देता येईल हे ती सतत बघत असते म्हुणुन मला

कौतुक वाटतं तिचे. काही वेळेस वाटतं की हा वेडेपणा आहे. आपल्याला बर आहे का नाही ,आपली एखाद्याशी इतकी ओळख आहे का नाही त्यांच्यासाठी सतत काहीतरी करायचं. याची काही गरज आहे का? पण मग मी विचार करतो शामा त्यातून आनंद मिळतो ना. ती म्हणते ना कुकिंग हा माझा श्वास आहे. खरंच पण कुकिंग हा तिचा श्वास आहेच. आमचे दोन महिने कसे संपले कळलंच नाही. आम्ही परत भारतात आलो. रोजचं रूटीन चालू झालं. रोज संध्याकाळी आम्ही मंदिरात जायचो तसे जाऊ लागलो. खूप दिवस झाले राधा काही दिसलीच नाही. मला शामा म्हणाली "कुठे गेली असेल हो राधा ?" दिसतच नाहीये ना. माझ्या लक्षात आहे तिच्यासाठी हलवा करायचा आहे. आपण एक काम करूया का? आपल्या कडे पत्ता आहे ना? तुम्ही एक काम करा सामान आणून द्या मला. मी हलवा करते आणि तुम्ही उद्या त्यांच्या कडे नेऊन द्या.

यस मॅडम. तुम्हाला कधी नाही म्हंटल का. घरी जाता जात सामान घेऊन जाऊयात मग तू कर हलवा. तु काही टेन्शन घेऊ नकोस उद्या मी नेऊन देईन. असं म्हणून आम्ही घरी गेलो. घरी आल्यावर शामा ने राधाच्या आईला फोन लावला आणि त्यांना विचारलं, उद्या तुम्ही घरी आहात का? मी राधा साठी खाऊ पाठवते. त्या म्हणाल्या. आहो उद्या घरी सकाळी कोणीच नसेल पण तुम्ही एक काम करा. मी वॉचमन जवळ निरोप देते. वॉचमनच्या जवळ ठेवून द्या डब्बा काही प्रॉब्लेम नाही. बरं बरं चालेल तसंच करते. असं म्हणून शामा ने फोन ठेवला. जेवण झाले आणि आम्ही दोघे टिव्ही बघत बसलो. टिव्ही बघता बघता

शामा डुलक्या  काढत होती. मी म्हंटलं शामा झोपली आहे का? नाही हो. थोडं थकल्यासारखं वाटतंय  आणि थोडा ताप आल्यासारखे वाटतंय. ताप. बर आपण चेक करूया. मी ताप चेक केला आणि बघतो तर काय? १०३ अगं शामा. बऱ्याच नाही तीन ताप तुला. चल चल आराम कर. झोपायला चल. हो हो  झोपतेच उद्या हलवा करायचा आहे ना.  मॅडम बरं नसेल तर तो हलवा वगैरे. असं म्हणून आम्ही झोपलो. का कुणास ठाऊक शामा ला खरंच बरं नव्हतं वाटत. रात्री ती शांत झोपली नव्हती. झोपेत फार कणत ही होती. सकाळी उठली. मी म्हंटलं शामा पाचच वाजलेत. हो पण हलवा करायचाय. तुम्ही सकाळी नेऊन द्या लगेच. अगं नाही. तू काही करू नकोस. एवढा ताप होता तुला. अजून नीट बरं पण नाहीये. नाही नाही मला अडवू नका. मला करायचा आहे हलवा माझ्या डोक्यात राहील ते. किती दिवस झाले दोन महिने झाले आपण तिकडे होतो एव्हाना आधीच द्यायला पाहिजे होता. अगं सगळं मान्य पण तब्बेत नाही का महत्वाची? एका हलव्याचे काय? आज नाही उद्या देशील. आधी बरी हो.  नाही नाही हो तुम्ही असं नका म्हणू तुम्हाला माहित आहे ना मला चैन नाही पडणार.

करू द्या ना मला हलवा. शामा तू कधी ऐकलस का आत्ता पर्यंत? बर ठीक आहे. पण मी तिथे उभं राहणार आहे हा तुला काही होईल लागलं तर. असं म्हणून आम्ही स्वयंपाकघरात गेलो. काय बोलू शामा बद्दल एवढा अंगात ताप आहे पण कमाल आहे ती अगदी पटकन हलवा तयार. चला चला मी डब्यात हलवा भरते. तुमच्या कडे राधाचा पत्ता आहे ना?  मग तुम्ही हा डब्बा  त्या

वॉचमन कडे द्या आणि त्याला सांगा  कर्णिक मॅडम चा डबा आहे हा त्यांना आठवणीने द्या. अगं अगं हो हो  मी जातो.ते काही नाही आत्ता जा. बाहेर खूप ऊन आहे थोडं ऊन कमी झाल्यावर जातो. नाही नाही हो. काही होत नाही. टोपी घालून जा. बर मॅडम मी जातो.  आपली टोपी घालून गेलो. खरंच रस्त्या मधे भयंकर ऊन होतं. जाणवत होतं. ऑक्टोबर हीट चालू झालीय. सुदैवाने पत्ता पण लगेच मिळाला ठरल्या प्रमाणे मी वॉचमनच्या हातात डबा दिला. त्याला म्हंटलं" कर्णिक मॅडम कडे दे " तो म्हणाला, हो मॅडम, ने  सकाळीच सांगितलेलं होत. आजोबा मी देतो .  घरी आलो. आल्या आल्या शामाने  विचारलं दिलात ना  हो डब्बा ? मी म्हणलो हो दिला. आता तू जरा बरी वाटतेस. हो बघा. मी म्हणलं ना कुकिंग माझा श्वास आहे  तो मी  घेतला आणि बरी झाले. खरंच तुझ कौतुक करावं तेवढं कमी आहे. ताप नाहीये ना आता. नाही. नाही. आता नाहीये. संध्याकाळी देवळात जायच्या आधी शामा मला म्हणाली. मी एकदा आरतीला फोन लावून विचारू का की तिला डब्बा मिळाला ना? अगं कशाला करेल ना ती गडबडीत असेल.  नाही नाही मी तरी मी लावतेच.  शामाने फोन लावला. हॅलो आरती शामा बोलतेय. मिळाला ना डब्बा ? हो बर बर. हो का? हा आणि राधा राधाला दिलास ना? बर बर हो का? हो नाही नाही. चालेल चालेल. चला चला. अच्छा. असे म्हणून शामा ने फोन ठेवला.

मी तिला म्हणलं शामा काय झालं गं? नाही काही नाही. काही नाही काहीतरी झालंय. अहो खरंच  काही नाही आवडला हा त्यांना हलवा. खूप छान

आहे.  शामा मला खोटं सांगू नकोस. कायतरी झालंय. नाही हो. काहीच नाही. शामा प्लीज सांग ना.  अहो काय झालं त्यांना तो डबा वॉचमनने दिला राधाने खाल्ला. पण आरती काही बोलली नाही की तो छान होता . बहुतेक त्यांना आवडलाच नसेल. जाऊ दे. मी माझं काम केलं ना. मला छान वाटलं. राधाने खाल्ला. आवडो न आवडो. असं म्हणून शामा आत गेली. माझ्या नजरेत नजर न मिळवता ती पटकन आत गेली. याचा अर्थ मला समजला होता की ती आरती त्या हलव्या बद्दल काहीच बोलली नसेल हे मला कळलं होतं. शामाला वाईट वाटणं साहजिकच आहे. त्या आरतीने दोन शब्द म्हंटले असते तर थँक्यू. किंवा छान झाला आहे. खोटं खोटं का होईना. थँक्यू आणि छान झाला आहे असं म्हणाली असती तर तिचं काय नुकसान थोडीच झालं असतं? मला हेच कळत नाहीये. आजकाल लोकांना एकमेकांचं कौतुक करणं तर जड झाले आहेच, पण दोन प्रेमाचे शब्द बोलणंही जड झालंय.  असा विचार करून मी सरळ आत गेलो. आत शामा बसली होती. मी मनात विचार केला. आरती जरी काही बोलली नाही तरी आज आपण बोलूया म्हणून मी शामा म्हणलं. शामा थँक्यू. शामा माझ्याकडे बघून म्हणाली. थँक्यू थँक्यू. कशासाठी? अगं नाही. खरंच थँक्यू तुला एवढं बरं नसताना सकाळी उठून तू छान हलवा केलास आणि मला तो आता खायला मिळणार. हे खरंच शामा. रियली थँक यू. माझं थँक्यू ऐकून शामा एकदम आनंदित झाली आणि तिचा तो आनंदी चेहरा बघून मला जे समाधान मिळालं ना. खरंच दोन शब्दांनी इतकी  कमाल होत असेल तर ते नक्की बोलावेत असं मी आवर्जून सांगिन.

# गंध

नीला नीला अगं कसला वास येतोय मघापासून? काय हो काय झालं? उदबत्तीचा वास आहे हा. तुम्हाला त्रास होतोय का? नाही त्रास नाही. पण ही उदबत्ती हा वास तुला कसं माहितीये? मला कसं माहिती असणार? अहो काल दारावर एक गरीब विद्यार्थी आला होता. म्हणाला, मॅडम, उदबत्त्या घेता का? तेवढीच मला मदत होईल म्हणून एक दोन तीन पाकिटं घेतली आणि त्यातलीच एक उदबत्ती आत्ता देवासमोर लावली. नीला ग नीला फार छान तू बेस्ट काम केलंस त्या उदबत्त्या विकत घेऊन. अहो काय झालं एवढं काय आहे या उदबत्तीच्या वासात? नीला तुला काय सांगू ग? माझं अख्खं बालपण गेलं या सुगंधा मधे. हो गं हो. हा उदबत्तीचा वास. त्याच्या अवतीभवतीच्या त्या आठवणी आणि आठवणीतली ती सगळी गोड माणसं. गोड माणसं म्हणजे कोण?

अगं मी आजीकडे जायचो ना? आजोळी कोकणात आजीकडे एक गडी होता नंदी नावाचा. नंदी खरच नावा प्रमाणे अगदी नंदी बैलासारखा प्रत्येक गोष्टीला मान हलवायचा. पण कधी उलट उत्तर देणं वगैरे नंदीच्या स्वभावातच नव्हतं. पांढरा शुभ्र सदरा तसेच पांढरे शुभ्र धोतर अगदी त्या दोन्ही गोष्टींवर कधीच डाग नसायचा. जणू त्याला स्वच्छतेची आवड होती. पडेल ते काम

करायची तयारी. चुकूनही कोणाला उलट सुलट बोलणे नाही आणि कोणाशी भांडण करणे पण नाही. आम्हा मुलांवर तर तो जीवापाड प्रेम करायचा. जणू काय आम्ही त्याची नातवंड आहोत. मला आठवतंय ना एकदा असच आजी कडे असताना खूप पाऊस पडलेला प्रचंड चिखल झालेला अशा चिखलातून घरी जायची माझी तयारी नव्हती. मी रुसून एका कोपऱ्यात बसलेलो. नंदी आला आणि मला म्हणाला, छोटे साहेब असं काय करताय घरी जायला हवं ना? मी नाही येणार या घाणेरड्या चिखलातून कोण चालणार आहे माझे पाय किती घाणेरडे होतील? अहो होऊ देत की.

आपलीच माती आहे काय होत घाण झाली की. अरे तुला काय मला नाही आवडत. मला सवय नाही अशी आमच्या मुंबईत असा चिखल देखील नसतो. बर बर. आता काय करणार? इथेच बसून राहायचं का नाही? मी आजीची वाट बघेन. आजी मला कडेवर घेऊन जाईल. अरे एवढंच ना. बसा की माझ्या कडेवरती माझ्या खांद्यावर. बसा बघू. नंदीने कुठलाच विचार न करता चटकन मला खांद्यावर घेतलं. आणि बघतो तर काय माझे चिखलाने माखलेले पाय त्याच्या पांढऱ्या शुभ्र शर्ट वरती अगदी ठसे उमटलेल्या सारखे उमटले होते. नंदी मला तसाच घरी घेऊन गेला. आजीने हा सगळा प्रकार बघितला. आजी मला ओरडली पण. अरे ही कुठली पद्धत आहे? एवढं काय अगदी. आला असतास तर चालत काय बिघडलं असतं? आता ह्या नंदीचे कपडे खराब नाही का झाले?

अहो बाई राहू दे की पण आपलं पोरगं खुशालीने घरी आलं ना ते महत्त्वाचं. अरे हो पण अशाने ही सगळी मुलं बिघडतील. काही बिघडत बिघडत

नाहीत बाई.  बर शेट चला आता हातपाय धुवून घेऊया म्हणून मला नंदी ने परत कडेवर उचललं आणि विहिरीवर नेलं. माझे स्वच्छ हात पाय धुतले जणू अंघोळ घातली मला. आणि मग मी परत खेळायला मोकळा. आजीकडे गेल्यावर आम्ही नंदीबरोबर कुठेकुठे फिरायचो. कधी कोणाच्या तरी शेतात बाजारात समुद्र किनारी गावातल्या मंदिरांमध्ये नंदी बरोबर आम्ही बिनधास्त फिरायचो. आणि तो आमची खूप काळजी घ्यायचा. संध्याकाळी आजी कडे दिवेलागणी झाली की आम्ही सगळी मुलं श्लोक म्हणायचो.

आमच्या घरातले श्लोक म्हणून झाले की नंदी आम्हाला सगळयांना घेऊन गावातल्या शंकराच्या मंदिरात जायचा आणि तिथे न चुकता संध्याकाळची उदबत्ती लावायचा. का कुणास ठाऊक? नंदी हे खूप वर्ष करत होता. कदाचित त्याचं नाव नंदी होतं म्हणून पण असेल पण न चुकता नित्य नेमाने एकाच वासाची उदबत्ती अनेक वर्ष नंदी लावत होता. जणू तो वास माझ्या डोक्यातच बसला होता. मी कधीही कुठेही हा वास अगदी सहजपणे ओळखला असता असा. एकदा शेजारच्या दामू बरोबर लपाछपी खेळत होतो. लपाछपी खेळता खेळता कधी संध्याकाळ झाली, अंधार झाला कळलंच नाही आणि मी सापडायला नको याच्यासाठी खूप आत ताटात जाऊन कोणाच्या तरी वाडीत जाऊन लपलो. आणि बघतो तर काय अंधार गुडूप. माझी अगदी घाबरगुंडी झाली. दोन्ही बाजूला नारळाची झाडं, आंब्याची झाडं. रस्ताच दिसेना. प्रचंड अंधार. आता काय करायचं? ओरडून ओरडून मित्रांना बोलवत होतो.

पण कोणी ओ पण देत नव्हतं. खूप तास झाले. घरी सगळे काळजीत पडले होते. कुठे गेला  खेळता खेळता ? आजीने सगळ्या मुलांना विचारलं. ओरडली पण. अरे तुम्हाला समजत नाही का? तो एवढा मुंबईहून आलाय त्याला इथली काही  माहिती नाही आणि असं सोडून आलात. आता कुठे अडकला असेल? एकतर एवढा बाहेर अंधार मुलं पण घाबरली. इतक्यात नंदी आला. म्हणाला, काळजी करू नका बाई. मी जातो ना कंदील घेऊन आणि आणतो शेठजींना. काळजी करू नका. आलोच मी लगेच. नंदी हातात कंदील घेऊन मला शोधायला बाहेर पडला. आणि इकडे मी अगदी रडकुंडीला आलो होतो. एकदम आकाशात काळे ढग जमून आले होते. सोसाट्याचा वारा येत होता.

मला काही कळत नव्हतं. कसं बाहेर पडू इथून. तिथल्या तिथे मी गोल गोल फिरत होतो. नंदी पण सगळीकडे गावात शोधत होता. प्रत्येकाला विचारत होता. मला कुणी बघितलं का? कुणी माझा आवाज ऐकला का? अचानक वारा पण खूप वाढला. नंदीचा कंदिल विझला. आता आली का पंचाईत कसं शोधायचं या मुलाला? असे विचार नंदीच्या डोक्यात आले. इथे कोणी ओळखीचं पण नाही की ज्यांच्याकडून कंदिल घेतला असता. तेवढ्यात नंदीला एक युक्ती सुचली. संध्याकाळी देवळात जायचं म्हणून. खिशामध्ये उदबत्ती आणि काडेपेटी होतीच. नंदीने ती उदबत्ती लावली आणि विचार केला चला या उदबत्तीच्या बारीकसा का होईना उजेड मध्ये आपण शोधू. पण शोधू मात्र नक्की.

इकडे माझी अवस्था अजूनच बेकार झाली होती. कंटाळून मी एका झाडाखाली बसलो होतो, असे ते सगळे किरण संपले होते. मी विचार केला. आता इथेच बसून राहू या अंधारात अजून कुठे जाणार? भीती पण वाटत होती आणि भूक पण लागली होती. इतक्यात मला त्या शंकराच्या देवळातल्या उदबत्तीचा वास येतोय असा भास होऊ लागला. हो. कदाचित आपल्याला भास होत असेल. इथे कुठे कोण उदबत्ती घेऊन येणार? पण एक मन म्हणतं नाही हा भास नाहीये. हा खरच वास सुगंध. हा सुगंध मी कधीच न विसरता येण्यासारखा. नंदी नंदीला लावतोय ही उदबत्ती कायम. मी जोरात कुठला न विचार करता ओरडलो नंदी नंदी.. इतक्यात नंदीला माझा आवाज ऐकायला आला. नंदीला थोडं हुश्य वाटलं. नंदी पण तिथून ओरडायला लागला. साहेब कुठे आहात तुम्ही? तिथेच थांबा. नंदी लगेच त्या वाडीत आला. पण इतका अंधार होता की मला नंदी दिसतच नव्हता.

पण उदबत्तीचा वास मात्र अजून जवळजवळ जवळजवळ आल्यासारखा वाटत होता हा. तेवढ्यात मला नंदी दिसला. मी धावत जाऊन नंदीला कडकडून मिठी मारली आणि रडायलाच लागलो. नंदीने माझे डोळे पुसले आणि म्हणाला आहो शेट तुम्ही तर एवढे शूर, घाबरट कसले? चला घरी चला. सगळे वाट बघतायत. नंदीने मला कडेवर घेतलं आणि घरी आणून सोडलं. आजी मला म्हणाली, अरे एवढ्या अंधारात तुला कुणाचा आवाज नाही आला. कुणी दिसलं नाही. पण मग तू नंदी नंदी करून कसा ओरडलास ? अगं नंदी जी उदबत्ती लावतो ना शंकराच्या मंदिरात त्याचा वास माझ्या डोक्यात बसलेला होता. मला

एकदम तो वास आपल्या जवळ जवळ येतोय असं वाटायला लागलं. मग म्हटलं हा नंदी असणार. आणि तो नंदी होता. बर बर असो. चल रे बाबा. देवच पावला. सुखरूप आलास ना घरी. नंदी माझ्याकडे हसत म्हणाला. काय शेट आता परत हरवायचं नाही बरं.

मी म्हटलं आणि हरवलं तरी तू आहेस ना शोधायला. आणि तुझी ही सुवासिक उदबत्ती. खरंच नीला  आज अनेक वर्षांनी तोच वास परत आला. जुन्याआठवणी जाग्या झाल्या.  नंदीला जाऊन अनेक वर्ष झाली. पण बघ ना काय गंमत येते. एखादा वास किंवा सुवास ह्याला मरण नाहीये गं. तो अजरामर आहे. फक्त तो अनुभवायचा आणि असाच अचानक कधी तरी अनुभवला की त्या गंध मागची एखादी गोष्ट किंवा व्यक्ती आपल्यासमोर अगदी जिवंत असल्यासारखी वाटते. नीला आज तुझ्यामुळे मी माझे बालपण परत एकदा अनुभवल्या सारखे वाटले. या गंध मुळे सगळया आठवणी परत जाग्या झाल्या. फक्त एकच खंत आहे. गंध होता माझ्याबरोबर. पण तो नंदी नव्हता.

# देविका

अरे देवा. ट्रेन चुकतेय की काय या भीतीने मी हातातलं काम सोडून तसाच स्टेशनवर गेलो. स्टेशनवर जाऊन जरा रिलॅक्स झालो. कारण साडे सहाची ट्रेन पावणे सातला येणार होती. मी असंच इकडे तिकडे फिरत होतो. फिरता फिरता मला अचानक ती दिसली. ती म्हणजे देविका देविका अय्यर. माझं मन मला विचारायला लागलं. ही इथे काय करतेय एवढे १० वर्षांनी विचारू का हिला? म्हणून मी थोडी दोन पावलं पुढे गेलो. पण माझं मन मला पंचवीस वर्ष मागे घेऊन गेलं. आणि मला आठवली  देविका आणि माझी पहिली भेट ती माझ्याकडे बघत होती. मी पण तिच्याकडे बघितलं आणि आम्ही बघतच राहिलो. जवळजवळ हा सिलसिला तीन चार महिने चालू होता. एकमेकांकडे बघण्याचा पण आम्ही कधीच बोललो नाही. आम्ही एकमेकांची नजरेतूनच बोलत होतो. अगदी सगळं मी तर  तिला मनापासून आपलसं मानले होते. पण कधी हिंमतच केली नाही बोलायची.

पण मग एकदा देविकाने पुढाकार घेतला आणि मला एक पत्र लिहिलं. पत्रात लिहिलं होतं माझं नाव देविका अय्यर. मी एम. कॉम आहे. बँकेत उत्तम जॉब. माझं तुझ्यावर अफाट प्रेम आहे. आता नजरेचा सिलसिला पुरे झाला. तुझं माझ्यावर प्रेम असेल तर संध्याकाळी साडे सहा वाजता मला भेट. नेहमीच्या

ट्रेनला. पत्र वाचून मी विचार केला. अगं साडे सहापर्यंत कशाला थांबायचं? मी आत्ताच सांगतो. माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. पण मग म्हंटलं ठीक आहे . साडे सहाला भेटलो की तुला प्रत्यक्ष सांगतो याच आनंदात मी ऑफिसला गेलो. आज अख्खा दिवस कसा काढायचा हे मला काही सुचतच नव्हतं. माझ्या मनात सारखं देविका, देविका, आपलं फ्युचर कसं असेल तुला मी कसं सांगू? माझं किती तुझ्यावर प्रेम आहे. आणि फायनली साडे पाच वाजले. मी आणि रोहन ट्रेन पकडायला म्हणून एकत्र निघालो. रस्त्यामध्ये अचानक रोहनला चक्कर आली. मी तातडीने त्याला हॉस्पिटलमध्ये नेलं. डॉक्टरांनी त्याला चेक केलं आणि बाहेर येऊन म्हणाले, तुम्ही कोण? मी म्हटलं मी संजय रेगे.

बरं संजय तुम्ही. बरं झालं यांना लवकर घेऊन आलात. यांना आत्ता एक माईल्ड हार्ट अटॅक येऊन गेला आहे. तुम्ही सगळं पेपरवर्क कम्प्लीट केलं का? मी म्हटलं हो डॉक्टर. त्यांच्या जीवाला काही धोका तर नाही ना? नाही नाही. आता एकदम ऑलराईट आहेत. मी म्हटलं, मी त्यांच्या घरच्यांना कळवलं आहे. ते येतीलच. मी निघू का डॉक्टर? मला एका ठिकाणी अर्जंट जायचं आहे. मी धावत पळत स्टेशन गाठले. बघतो तर काय? माझी साडे सहाची ट्रेन चुकली होती. बापरे! देविका माझ्याबद्दल काय विचार करत असेल? तिला काय वाटलं असेल? मी तसाच स्टेशनवर उभा राहिलो. विचार करत इकडे तिकडे फिरत राहिलो. जाऊदे आज नाही पण उद्या जेव्हा ती भेटेल तेव्हा तिचा गैरसमज दूर करीन. तिला सगळा प्रकार सांगेन म्हणून मी दुसऱ्यादिवशी लवकरच स्टेशनवर आलो. पण देविका आलीच नव्हती.

मी रोज स्टेशन वरती लवकर यायचो की साडे सहा च्या आधीच्या ट्रेन किंवा नंतरच्या ट्रेन कधीतरी देविका येईल  पण देविका कधी आलीच  नाही आणि आज आत्ता भेटली ती पण पंचवीस वर्षांनी माझ्या मनात परत एक प्रेमाचं फुल जागं झालं. म्हणलं आपण हिच्याशी बोलून गैरसमज तर दूर करूया म्हणून थोडसं तिच्या जवळ  गेलो आणि तिला म्हणलं देविका तिने मागे वळून बघितलं पण तिच्या नजरेत पूर्वीसारखे भाव नव्हते आणि ते काहीतरी वेगळंच सांगत होते. ते म्हणत होते संजय आता खूप उशीर झालाय या गोष्टीचा आता काहीच उपयोग होणार नाही. तू प्लीज तुझ्या मनातले मनातच ठेव. तू कृपया परत काही बोलू नकोस. मला माफ कर. मी आता काहीच करू शकत नाही तुझ्यासाठी. माझ्या डोळयांनी तिच्या डोळयांतले सगळं भाव स्पष्टपणे समजून घेतले आणि माझ्या मनाने ते सगळं शांतपणे  स्विकारले ही. काहीच न बोलता मी तसाच मागे आलो विचार करत करत ट्रेन मध्ये चढलो  आणि मनात म्हटलं. एकदा एक ट्रेन चुकली आणि  माझं आयुष्यच सगळं गणित  बदलून गेलं.

# अभिप्राय

अगं बघतेस का? केव्हापासून तुझा फोन वाजतोय ,आहेस तरी कुठे ? जरा बघ कोणाचाफोनआहे ते. हो बघते बघते आत आहे मी फोन बाहेर आहे माझा . हॅलो कोण सीमा बोल ग काय म्हणतेस? काय चाललंय? मी आत होते ना त्यामुळे वेळ लागला फोन घेण्यासाठी आणि आवाजच आला नाही फोनचा. तेवढ्यात हयांनी सांगितले.फोन वाजतोय.मग बघितले तर तुझाफोन .मी मस्त बाबा पण छान आहेत. जस्ट आले आहेत बॅडमिंटन खेळून. तुम्ही सगळे कसे आहेत?

काय मुलं गेली का शाळेत? आणि राजन काय आज ऑफिसला गेलाय का? तुझं काय? तुला रोजच जायला लागतंय का? एका अर्थी बरं आहे ग. वर्क फ्रॉम होम चा कंटाळा येत असेल ना घरात बसून बसून. ऑफिसला गेलीस की चार लोक दिसतात. बोलणं होतं जरा बदल . माझं छान चालू आहे रोज . संध्याकाळी सगळ्या मैत्रिणी देवळात भेटतो. आता काही दिवसांनी विचार करतोय सगळ्या मैत्रिणी मिळून न कुठे तरी फिरायला जायचा. अगं आजकाल इकडे पण सगळे छान एन्जॉय करत असतात. बाबा पण रोज चालायला जातात अगदी न चुकता. बर अगं तुमचं बुकिंग झालं का? तुमचे काय कधी येणार आहेत? चला. चांगलंय बुकिंग झाले ते . आम्ही अगदी आतुरतेने वाट बघतोय

तुमच्या येण्याची. कोण तुमचे मित्र मैत्रिणी येणार आहेत का वा फार छान हो अगदी काहीच प्रॉब्लेम नाही त्यांना उलट छान वाटेल. परदेशी पाहुणे येतील आपल्याकडे आणि त्यांना आपली संस्कृती आपल्या दिवाळीचा आनंद घेता येईल. तू काही काळजी करू नको. आम्ही इकडे सगळी तयारी करून ठेवतो. तुम्ही या. आपण छान मज्जा करूया. अगं हो, मी नाही जास्त त्रास करून घेणार. जेवढं जमेल तेवढ्या गोष्टी करीन आणि फराळाचं तू आल्यावरच करू. नेहमी प्रमाणे आपण वर्षानुवर्षे जसं चाललंय तसच करूया. ओके ओके चालेल. चला बाय. ठेवते.

काय गं काय म्हणत होती सीमा? काही नाही हो ती म्हणाली की बुकिंग झालंय आणि त्यांच्याबरोबर या वेळेला त्यांचे काही मित्र मैत्रिणी येणार आहेत. त्यांना भारतातली दिवाळी बघायची आहे. मी म्हणलं या काहीच प्रॉब्लेम नाही. अगं हो येऊ दे की. हे मात्र राजन आणि सीमाने छान केलं. या निमित्त्याने या विदेशी पाहुण्यांना आपल्या भारतीय संस्कृतीची छान ओळख होईल. हो. सीमा म्हणत होती की ते पाहुणे मंडळी फार उत्सुक आहेत भारतात येण्यासाठी. आणि ती म्हणाली की पाहुणे मंडळी आल्यावर आपण सगळे मिळून फराळ करूया. तुम्ही उगीचच आत्ता घाई घाई करून सगळा फराळ करू नका. म्हणजे कसं

त्यांनाही समजेल की आपण कसं काय पदार्थ करतो. सगळे एकत्र येऊन आपण दिवाळीची तयारी कशी करतो ते. अरे व्वा मस्तच प्लॅन आहे की चला

नातवंड पण अगदी  खुशीत असतील हो ना सुपर एक्सायटेड झाले आहेत दिवाळीसाठी.

वा वा फार छान चला म्हणजे हया  वेळेला घर अजून भरलं भरल्यासारखं वाटणार आहे. आता हे पंधरा दिवस पटकन जायला पाहिजेत.# अहो जातील अगदी  पटकन जातील लगेच. उलट दिवस कमीच पडतील हो ना मग लागूया तयारीला आज पासून. शोभा ये शोभा आता कामाला सुट्टी मिळणार नाही खूप पाहुणे येणार आहेत सीमा बरोबर आपल्या घरी खूप तयारी करायची आहे आपल्याला. चला कामाला लागूया आणि मग पंधरा दिवसांनी.

अहो चला पटापट आवरा ना आत्ता ६ वाजतील आणि  राजन ,सीमाच्या विमानाची वेळ होईल नुसती गडबड चालू आहे माझी. त्यात आज शोभा पण आली नाही अजून. अग हो आवरतोच आहे मी पण. अहो जरा बघता का? बेल वाजते आहे. कदाचित शोभा आली असेल,माझ्या अगदी  एक दोन चकल्या राहिल्या आहेत. येस मॅडम बघतो बघतो. कोण हवंय आपल्याला? नमस्कार सर मी सुधीर हे माझे कार्ड ऑल इन वन कंपनीचा सेल्समन आहे मी. तुमच्या सोसायटीत आलोय आमच्या कंपनी चे सॅम्पल प्रॉडक्ट्स घेऊन हे तुमच्या सेक्रेटरींचे लेटर. हो येस मला मिस्टर खरे म्हणाले होते की कोणी तरी येणार आहे तुम्हाला भेटायला. तुम्हाला आमचे  रेव्हिएवस वगैरे हवेत ना तुमच्या प्रॉडक्ट बद्दल. हो साहेब. या या आत या ना. अग जरा पाणी आणतेस का? हो आले आले हा. बसा ना आपण .हे घ्या पाणी. बर ओळख करून देतो. हे मिस्टर सुधीर ऑल इन वन कंपनीचे सेल्समन आणि  हो  आमच्या सौ नमस्कार.

नमस्कार मॅडम तुमच्याकडे पण वेळ असेल तर मॅडम तुम्ही थांबू शकता का थोड्या वेळ ? हो का नाही थांबू शकते थोड्या वेळ. थांबा येतेच मी जरा चहा आणि काहीतरी खायला घेऊन येते. मॅडम नाही नको उगाच त्रास करून घेऊ नका .त्रास काय यात तुम्ही बोलत बसा हा येते मी लगेच. हे घ्या चहा आणि गरमागरम चकल्या. खरंच मॅडम चहासाठी थँक्यू. बर सर मी तुम्हाला आता आमच्या प्रॉडक्ट्स बद्दल थोडी माहिती सांगतो. आमच्या कंपनीने दिवाळीसाठी खास काही प्रॉडक्ट्स लाँच केले आहेत. हे पहा हे आहे उटण्याचे अत्तर. काय झालंय ना आजकाल इतका भेसळीचा जमाना आहे की ते उटणे वगैरे लावून स्किनला प्रॉब्लेम

होतात. त्यामुळे हे उटणे लावण्याची गरजच नाही. आमच्या कंपनीत हे अत्तर लावलं की तुम्हाला असं वाटेल. व्वा! काय सुंदर अभ्यंगस्नान झालंय आपलं.फक्त अत्तर लावायचं असे काही साबणाचे पण आहेत. बर हे काही आकाशकंदील चे स्किटर . ह्याच्यात रेडीयम असल्यामुळे ते स्वतःच चमकतात.फक्त भिंतीला केव्हा खिडकी कुठेही लावा म्हणजे लाईट बिलाची कटकट नाही बर आणि अचानक लाईट गेले काही त्रास पण नाही. ह्या आहेत वातलेस पणत्या.फक्त पाणी घातले की लगेच उजेड. तेलाचा खर्च नाही कापूस पण वाया जाणार नाही.

फार विचार करून आमच्या कंपनीने प्रोडक्टस बनवले आहेत. बर आता पुढचे प्रॉडक्ट्स तर अगदी सगळ्यांना आवडेल असं हे आहेत. दिवाळीच्या फराळाचे लीप बाम, फराळाचे लीप बाम. म्हणजे? हो मॅडम. अहो हे आहे

चकली चे लीप बाम. हे चिवडा, हे शेव ,हे लाडू. मला कळत नाहीये तुम्ही काय म्हणताय? सांगतो सांगतो. अहो म्हणजे चकली चे  लीप बाम जे आहे ना ते फक्त ओठांना लावायचे की असा फील येतो की आपण खरी चकली खाल्ली की काय? म्हणजे कसं आहे हेल्थ कॉन्शस लोकांना चिंता नाही. नाहीतर कसं होतं दिवाळीत लोक फराळ करतात, मग वजन वाढले की मग जिमला जा ,वॉकला जा. वाढलेले वजन कमी करण्यासाठी कष्ट करा. खूप वेळ आणि खूप पैसा पण खर्च  होतो. आमचे  लीप बाम नुसते लावा लगेच फराळ खाल्ल्याचाफील. कशी वाटली आयडिया ? कोणाला ही गिफ्ट देण्यासाठी अगदी उत्तम आहेत आमचे प्रॉडक्ट्स. म्हणजे कसं कोणी तुमच्याकडे फराळासाठी येणार नाही. तुम्हालाही कुणाकडे जायची गरज नाही कोणाकडे . या फराळाच्या  लीप बामच्या बाटल्या पाठवल्या की झालं? सुधीर ते सगळं बोलणं ऐकून मी आमच्या सौ कडे नजर फिरवली आणि ती पण माझ्याकडे बघत होती. आम्ही एकमेकांकडे बघून हसलो. जणू आम्हाला माहिती  होतं एकमेकांच्या मनात काय चाललंय? मी सुधीरला म्हटलं, मिस्टर  सुधीर बरोबर आहे तुमचे सगळे प्रॉडक्ट्स अगदी आधुनिक आहेत. अगदी खूप विचार करून केलेले. यात वाद  नाही. पण आमचा खरा फिडबॅक सांगू का? मला हे असे प्रॉडक्ट्स बघून भीती वाटते. काही कारणांमुळे ,नोकरीसाठी ,शिक्षणासाठी आजकाल आमच्या सारख्या खूप लोकांची मुले मुली ही घरापासून दूर राहतात. आमच्यासारखे कितीतरी  लोक एकेकटे राहतात. पण या सणावारांमुळेच त्यांच्या मुलांना नातवंडाना त्यांची आठवण येते.त्या निमित्त्याने ते घरी येतात.

हो ना हो अगदी  बरोबर म्हणालात. अहो मिस्टर  सुधीर. एक सांगू का? हे उटण्याचे  अत्तर आहे फार  सुवासिक. पण हे जे आपण उटणं करतो ना घरी किंव्हा  विकतचे ह्याच्यात जे वापर करतो ते आपल्या त्वचेसाठी फार  उपयुक्त गोष्टी असतात.

आता ते आपलं दुर्भाग्य की सगळीकडे भेसळीचा जमाना आलाय. पण अहो या निमित्त्याने मुलं नातवंडं जेव्हा दिवाळीला घरी येतात. सगळे एकत्र उठतात.  उटणे एकमेकांना लावण्याचा आनंद , त्यामागच्या भावना या खूप वेगळ्या असतात. तो आनंद  वेगळाच असतो. तो असं अत्तर लावून अनुभवायचा नसतो. बरोबर आहे स्टिकर पण अगदी छान आहेत कंदील साठी. पण खरं सांगू त्याच्याने काय होणारे आहे. एक दोन रुपये इकडे तिकडे बिलाचे होतील. पण जे नातवंडे मुलांबरोबर आई बाबांबरोबर एकत्र वेळ घालवून आपापल्या परिस्थितीनुसार जे कंदील  करायची मजा आहे ना ती ह्या  स्टिकर मध्ये नाही. अहो त्या निमित्त्याने मुलं तुमच्या जवळ येतात. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात एकत्र  वेळ घालवण्याची ही योग्य संधी आहे. नुसतेच स्टिकर लावून वेळ मारून नेण्यात अर्थ नाहीये. कसं आहे ना आयुष्यात वेळ हा खूप आहे. वेळ हा काढायला पाहिजे आणि आपल्या मुलांसाठी तर नक्कीच. बर आता विषय  तुमच्या लीप  बामचा  तुमची आयडिया अगदी  छान एकदम वेगळी पण खर सांगू का ह्या फराळ करण्याच्या मागे पण हीच संकल्पना आहे. अहो एकत्र  येऊन फराळ करणं, एकमेकांच्या घरी फराळ देणं त्यामुळे आज

आपल्याकडे आपली मुलं,नातवंड, शेजारी, नातेवाईक येतात. एकत्र येऊन मज्जा करतात.

विचारांची देवाण घेवाण होते. सुख दुःख शेअर केली जातात. वेगवेगळ्या घरचा फराळ खाण्यात जो आनंद असतो ना तो असा लीप बाम लावून अनुभवता नाही येत आणि वजन वाढलं तर काय होतंय? अहो जर आपल्याला दरवर्षी माहितीय की दिवाळीच्या निमित्त्याने फाराळ खाऊन आपले वजन वाढणार आहे तर याचे प्लॅनींग आधीच करायला पाहिजे. आजकालची पिढी तेवढी स्मार्ट आहे ना? नको तिथे बरोबर विचार करतात . मग करा की या पण गोष्टींचा विचार. आधीपासूनच प्लॅनींग करून जिम जॉईन करा, चालायला जा, आधीपासून थोडा आहार कमी करा. सगळ्या गोष्टी बॅलन्स करण्यात एक्सपर्ट आहे ना ही नवीन पिढी मग करा की इथे पण थोडासा बॅलन्स आणि घ्यायचा आस्वाद सगळ्या पदार्थांचा काय बिघडतंय त्यात? असं करूनच तर आपले सणवार आणि आपली संस्कृती ही पुढच्या पिढीला कळेल.वातलेस पणत्याची कल्पना पण छान आहे, पण वातीच्या पणतीचा उजेड हा शुद्ध उजेड आहे या उजेडा मुळे सगळे घर उजळून जाते. अहो ना हो. तुम्हाला काय वाटतं? हो अगदी बरोबर बोललीस. सॉरी मिस्टर सुधीर. आम्ही जरा स्पष्टच बोललो. पण हे आमचे विचार आहेत. तुम्ही अभिप्राय मागितला म्हणून आम्ही स्पष्टपणे सांगितले.

नाही सर,सॉरी काय उलट तुमचे विचार ऐकून माझे डोळे उघडले आहेत . मी आजच्या आजच कंपनीत कळवतो. तुमचा खराखुरा अभिप्राय. एकदम

बरोबर आहे तुमचं आणि मला तुमचे सगळे बोलणे पुरेपूर पटले आहे . या आधुनिक करणाच्या जगात मी स्वतः विसरूनच गेलो की आपली संस्कृती जपणं जास्त महत्त्वाचं आहे. प्रॉडक्ट्स काय येतात जातात पण भावना, प्रेम, नाती या टिकणं जास्त महत्त्वाचं आहे. एकदम बरोबर बोललात मिस्टर सुधीर. अहो चहा तर घ्या गार झाला असेल आणि चकली पण खा. हो घेतो ना? वा वा किती सुंदर झालीय चकली. खरंच मॅडम. प्रत्यक्ष चकली खाण्यात जी मज्जा आहे ना ती मज्जा या चकलीच्या लीप बाम मध्ये नाहीये हे अगदी पटल मला.

# एक रिप्लाय

अनुजा अगं अनुजा आवरून झालं की नाही मॅडम? मी केव्हाचा थांबलोय. अगं आपली मिटिंग आहे ना. उशीर होईल. आले आले रे . एकच मिनिट थांब. येतेच खाली. मावशी काकांना गाडी करायला सांगा बाहेर. आम्ही दोघे येतोच. बर साहेब. सांगते ये. चल चल रे. झाले मी तयार. अरे आज काय गडबड झाली. सकाळी मुलांचं पण आवरायचं होतं ना? आज शाळेतून तसेच आईकडेच जाणार आहेत . त्यामुळे सगळी गडबड झाली रे. चल चल आपण निघूया. मावशी दार लावून घ्या. आज मी हाल्फ डे ने घरी येईन. मग सांगते स्वयंपाकाचं वगैरे काय करायचं ते. ठीक आहे मॅडम . दार लावून घ्या. आम्ही दोघेही गाडीत बसलो. मिलिंद म्हणाला. अनुजा आजची मिटिंग झाल्यानंतर तू हाल्फ डे घरी जाणार आहेस ना. काही प्रॉब्लेम नाही. मला जरा आज थोडा उशीर होईल. विचार करतोय की साईटवर जाऊन येतो. म्हणजे जरा कामे पटपट होतील. मला उशीरच होईल. ठीक आहे ना. हो रे. काहीच प्रॉब्लेम नाही.

दुपारी मिटिंग झाली आणि ठरल्याप्रमाणे मी हाल्फ डे ने घरी आले. आल्यावर मावशी मला म्हणाल्या, मॅडम, चहा देऊ का? काही खायला करू. तुम्ही सांगा. नाही नाही. एक काम करा. खायला नको. कारण दुपारी खूप उशिरा जेवण झालाय. मी पटकन फ्रेश होते आणि स्टडी मध्ये बसते. तुम्ही चहा स्टडी

मध्येच घेऊन या. ठीक आहे मॅडम, तुम्ही म्हणाल तसं. मी लगेच फ्रेश झाले आणि स्टडी मध्ये बसले. वातावरण अगदी पावसाळी झालं होतं. अचानक जोर जोराचा वारा आणि पाऊसही यायला लागला. मी इकडे जगजितसिंग च्या सुंदर गझल लावल्या होत्या आणि हातात गरमागरम चहाचा कप तो घेऊन मी खिडकीतून बाहेर डोकावत होते. बघते तर काय? बापरे! पावसाने अगदी रुद्रावतार घेतला होता. मला पुढचं काही दिसतच नव्हतं. पण एवढं मात्र वाटलं. कोणतरी दाराशी उभ आहे. कोण आहे ते बघण्यासाठी मी बाहेर गेले.

छत्रीचा काही उपयोगच नव्हता. एवढा वारा होता की छत्री अगदी उलटीपालटी होत होती. मी दाराशी गेले. बघते तर काय? साधारण पंचवीस तीस वर्षांची एक मुलगी तिच्या छोट्या मुलाबरोबर आमच्या दाराच्या बाहेर उभी होती. बाजूला एक बंद टू व्हिलर पण होती त्या दोघांना बघून मी म्हंटलं. खूप वेळ झाला. तुम्ही इथे उभ्या आहात आणि भिजला पण आहेत पूर्ण. आत येता का? पाऊस थांबेपर्यंत? आत बसा इथे. उगीच भिजून आजारपण येईल बर. मी. अनूजा साने. आपण. मी ऋता भावे. इथेच एका आयटी कंपनीत जॉब करते. मुलाला पाळणा घरातून घेऊन घरी जात होते. अचानक खूपच पाऊस चालू झाला आणि गाडी बंद पडली. कळत नव्हतं. कुठे थांबायचं म्हणून तुमच्या घराच्या बाहेर उभे राहिले. सॉरी तुम्हाला त्रास. अगं मला काहीच प्रॉब्लेम नाही. खरंच सांगते काहीही प्रॉब्लेम नाही. तुझी जर काही हरकत नसेल ना तर आत या ना मला आवडेल. बर येते . मी ऋता आणि तिचा मुलगा आम्ही तिघे जण आत आलो. मावशीने लगेचच टॉवेल आणून दिले. ऋताला मी ते टॉवेल देऊन

म्हंटल. ऋता बाजूला ही एक खोली आहे इथे. तू फ्रेश होऊन घे. तोपर्यंत मावशी चहा घेऊन येतीलच. ठीके. मी आलेच पाच मिनिटांत ऋता आणि तिचा मुलगा फ्रेश होऊन बाहेर आले. तिचा मुलगा अगदी गोड होता. एकदम शांत. मी म्हंटलं काय रे तुझं नाव. त्याने लाजुन ऋताला मिठी मारली आणि माझ्याकडे हळूच बघून म्हणाला, रुद्र. किती रे गोड नाव आहे तुझं. शाळेत जातोस. हो जातो ना? मी इयर वन मध्ये आहे. अरे व्वा! मस्त. तो पुन्हा लाजला. मावशीने त्याला मुलांची काही खेळणी दिली खेळायला. त्यामुळे तो रमला होता. ऋता म्हणाली, आज सगळी गडबड झाली. दुपारी शाळेतून फोन आला की याला ताप आलाय घेऊन जा.

म्हणून आम्ही लवकर निघालो. निघालो आणि विचार करत होतो की डॉक्टरांकडे जाऊया . पण वाटेत केवढा पाऊस आला आणि  गाडी बंद पडली. अरे याला ताप आहे का? असं म्हणून मी रुद्रला हात लावून चेक केलं. अगं खरच रुद्रला खूपच ताप दिसतोय. हो ना? मला वाटलच  भिजल्यामुळे अजूनच ताप आला असेल. अगं मग त्याला डॉक्टरांकडे घेऊन जायचं का? अहो डॉक्टरांना फोन लावलेला. पावसामुळे डॉक्टर आज येणार नाहीत दवाखान्यात. तेच कुठेतरी अडकून बसलेत. अरे बापरे! डोन्ट वरी. आपण एक काम करूया. आमचे फॅमिली डॉक्टर आहेत पोतनीस. म्हणून मी त्यांना फोन लावते. त्यांना सांगते असं एक जण येतील. त्यांना तुम्ही चेक करा. ड्रायव्हर काका तुम्हाला घेऊन जातील. काळजी करू नकोस. मी लगेच उठले. पोतनीस. डॉक्टरांच्या दवाखान्यात फोन लावला. हॅलो डॉ. पोतनीस आहेत का? सर आहेत. पण बिझी

आहेत खूप. नंबर आहेत आत्ता.  आज आत्ता नवीन नंबर मिळणार नाही. मॅडम सॉरी. तुम्ही उद्या फोन करा प्लिज. मॅडम थोडसं जरा अर्जंट काम आहे. बघा ना काही होतंय का? नाही हो. पावसामुळे खूप गर्दी आहे. आत्ता तर काही शक्यच नाही. बर ऐका ना. मी मिसेस अनुजा साने बोलतेय. हो. साने मॅडम तुम्ही फोन केलात का? आधी सांगायचं ना? काय प्रॉब्लेम आहे? नाही. माझ्या ओळखीचे एक जण येतील. त्यांच्या मुलाला जरा ताप आलाय तर जरा बघा ना. सरांना वेळ झाला की ह्यांना चेक करायला सांगाल. हो हो मॅडम नक्की पाठवा तुम्ही. काही प्रॉब्लेम नाही. येस येस. येतीलच ते थँक्यू. सोबतच मी त्याला म्हंटल ड्रायव्हर काकांना गाडी काढायला सांगते आणि ते तुम्हाला घेऊन जातील डॉक्टरांकडे. तू काही काळजी करू नकोस. ऋता म्हणाली. टू व्हिलर आजच्या दिवस राहू दे का इथे? मी उद्या घेऊन जाते. हा माझा नंबर तुमचा नंबर देता का? मी पण माझा नंबर दिला.

आम्ही दोघांनी एकमेकांचे नंबर सेव्ह केले. ड्रायव्हर काका यांना पोतनीस डॉक्टरांकडे घेऊन जा आणि तिथेच थांबा. मग त्यांना घरी सोडा. मग या. हो मॅडम. चला काही काळजी करू नका ताई . असं म्हणून ड्रायव्हर काका ऋता आणि तिच्या मुलाला पोतनीस डॉक्टरांकडे घेऊन जातात. या सगळ्या प्रकारात कधी रात्र झाली आणि माझा हाल्फ डे कसा संपला कळलंच नाही. नेहमीसारखे रुटीन चालू झाले परत. आज आम्ही दोघही सकाळी लवकर ऑफिसला गेलो होतो. संध्याकाळी आल्यावर ऋताची  टू व्हिलर काही दिसली नाही. मी मावशींना म्हटलं, त्या कालच्या मॅडम टू व्हिलर येऊन गेल्या का त्यांची ? घेऊन

गेल्या का काही कळलं नाही मॅडम पण बहुतेक नेली असावी. असेल बहुतेक. मला काही मेसेज वगैरे आला नाही. ठिक आहे. जाऊ दे. दोन तीन दिवस वाट बघते आणि मीच मेसेज करते. असा विचार केला आणि अगदी तसंच झालं. तीन चार दिवस झाले ऋताचा काहीच मेसेज नाही. मग मलाच राहवेना. मीच तिला मेसेज केला. गुड मॉर्निंग ऋता कशी आहेस? दोन तीन दिवस झाले. तुझा काही मेसेज नाही. गाडी घेऊन गेलीस का? बरं रुद्राचा ताप कसा आहे? पोतनीस डॉक्टरांनी व्यवस्थित चेक केलं ना? ड्रायव्हर काका म्हणाले. त्यांनी तुला व्यवस्थित घरी सोडलं. पण मी विचार केला की जनरल तुला मेसेज करून विचारूया. आशा आहे की सगळं नॉर्मल असेल. कळावे. अनुजा साने. बघू आता याच्यावर हिचा काही रिप्लाय येतोय का? मी माझ्या कामामध्ये परत बिझी झाले. पण तरी ऋताची आठवण मला मध्येमध्ये येतच होती. तीन चार दिवस झाले. ऋताचा काहीच मेसेज नाही. सगळं नॉर्मल असणार ना. काय झालं काय माहिती? वर धड तिचा घराचा पत्ता पण नाही माझ्याकडे. की जाऊन चेक केलं असतं. मी जरा अस्वस्थच होत होते. कामात लक्ष लागत नव्हतं. सहजा मला असा काही अनुभव येत नाही.

मी कोणाला मेसेज केला आणि त्यांनी रिप्लाय दिला नाही असा. या वेळेला हे असं काय का ही रिप्लाय देत नसेल असे सारखे विचार माझ्या डोक्यात येत होते. मी अशी बैचेन असले ना की माझं कशातही लक्ष नसते आणि मी अशी बैचेन झाले की मिलिंद ला हे लगेच लक्षात येते आणि तसंच झालं. जेवण झाल्यानंतर मिलिंद मला म्हणाला, अनूजा बीच वर जायचं का

वॉकला? आत्ता हो जाऊया ना? बघ ना हवा किती छान आहे. आणि थोडं गप्पा पण मारू. मी म्हटलं ओके. चल जाऊया. गाडी काढून आम्ही दोघे बीचवर गेलो. सुंदर चांदणं पडलं होतं. आम्ही दोघं चाललो होतो. मिलिंद मला म्हणाला, अनुजा हम्म  सांग आता  मला काय प्रॉब्लेम झालेत. मला माहीत आहे की ऑफिसमधे तर काहीच प्रॉब्लेम नाहीयेत. घरी पण सगळं उत्तम चाललंय. तुझ्या माहेरी पण सगळं उत्तम चाललंय. काय झालं सांगशील? मी म्हटलं, अरे मिलिंद, तुला आठवतंय का? त्या दिवशी खूप पाऊस पडत होता आणि ती ऋता हो आठवतंय ना? मग अरे मी तिला मेसेज केला पण तिचा काहीच रिप्लाय आला नाही त्याच्यावरती. अगं येईल बिझी असेल ती. तू फार विचार करतेस आणि तुला असं वाटत  सगळ्यांनी तुला लगेच रिप्लाय करावे. तू सगळ्यांचं खूप मनापासून करतेस ग पण असं गरजेचं नाही की त्यांनी पण तुझं तसंच करायला पाहिजे. समजत नाही तुला काय म्हणतोय ते. हो रे. पण काय करू? मला डोक्यातून जातच नाही  हा विषय.  सगळं ओक्के असेल ना? अगं असेल ते असेल. थोडा वेळ जाऊ दे ना. कळेल आपल्याला. बरं  सर, तुम्ही म्हणाल तसं. असं म्हणून मी मिलिंद कडे बघून हसले. मग आम्ही दोघे घरी आलो. आज मी अगदी शांत झोपले होते. कसलाही विचार न करता. आता मात्र पंधरा ते वीस दिवस झाले.

तिचा अजूनही काहीच रिप्लाय आला नव्हता मी पण आता विचार करणं सोडून दिलं होतं. आज खूप दिवसांनी मुलांना घेऊन आम्ही रेस्टॉरंटमध्ये जाणार होतो. मुलांचीच फर्माईश होती. त्यांना चायनीज खायचं होतं. ठरल्याप्रमाणे

आम्ही चौघेही जेवायला गेलो. रेस्टॉरंट मध्ये खूप गर्दी होती. ऑलरेडी बुकिंग केल्यामुळे आम्ही निवांत जाऊन बसलो. बघतो तर काय? तिथे कुणाचं तरी बर्थडे सेलिब्रेशन चालू होतं. मी इकडे तिकडे नजर फिरवली. बघते तर काय? ऋता आणि रूद्र आणि त्याचे बाबा. तिघेही जण मला दिसले. मी एकदम उठले आणि ओरडले. ऋता. तिने पण पटकन मागे बघितलं आणि मला लांबूनच अच्छा केला. आणि मग ती त्या बर्थडे पार्टीला आली होती. त्यामुळे जरा बिझी होती. अच्छा करून ती आत गेली. मी मात्र विचार करत परत माझ्या जागेवर बसले. घडलेला सगळा प्रकार मिलिंद बघत होता. मला म्हणाला, अनुजा एक सांगू प्लीज. आता या ऋताला तुझ्या डोक्यातून काढून टाक बरं. अरे पण तिने मला ओळख दाखवली. पण मेसेज चा रिप्लाय का नाही दिला रे? अगं जाऊ दे. तू तुझं काम मनापासून केलंस. मनापासून तिला मदत केलीस. तिचा रिप्लाय आला नाही तर नाही आला अपेक्षा ठेवणं हे चुकीचं आहे आणि आपण एखाद्याला फोर्स नाही करू शकत. सो मॅडम जाऊ द्या. जे झालं ते झालं. आता आपण छान डिनर एन्जोय करूया. असं म्हणून मिलिंदने माझी समजूत काढली. आम्ही डिनर चा आस्वाद घेत होतो. तेवढ्यात मिलिंद ने खिशातून मोबाईल काढला आणि एकदम म्हणाला. पाच दिवस झाले ह्या समीरचा काही रिप्लाय आला नाही. काय करत असतात ना लोक? खरच काय प्रॉब्लेम आहे एक रिप्लाय करायला. मी हे ऐकून मिलिंद कडे बघितलं आणि मिलिंदच्या ही लक्ष्यात आलं आणि आम्ही दोघ एकमेकांकडे बघून जोरजोरात हसायला लागलो.

# मनाची नाती

इतक्या सकाळी सकाळी कोणाचा फोन? हॅलो हा बाबा बोला ना मिनू. एक काम होतं. तू येऊ शकशील का इकडे? आईची तब्बेत जरा बरी नाहीये. आम्हाला तुमची गरज आहे. जमल्यास येना. रमेशच मी समजू शकतो. रमेशला सोनियांची डिलीवरी अगदी तोंडावर आल्यामुळे तिकडे थांबणं गरजेच आहे. त्यामुळे तो येऊ शकत नाहीये. तू जरा बघितलंस तर. हो बाबा, मी तुम्हाला दुपारपर्यंत सांगू का? मी नेमका मिलिंद नाहीये इथे दहा पंधरा दिवसांसाठी आणि मुलं एकटीच आहेत. मी तुम्हाला मिलिंद ची बोलून दुपारी सांगते. त्याला विचारते त्याला शक्य आहे का? लवकर निघणं आणि तसं कळवते. बघ ना जरा. कारण आईच अर्जंट बेसिस वर ऑपरेशन करायला लागणार आहे त्यामुळे थोडी मदतीची गरज आहे ग. मी समजू शकते बाबा. पण मी कळवते तुम्हाला. असं म्हणून मी फोन ठेवला. फोन ठेवला आणि मिलिंदला फोन लावला. हॅलो मिलिंद सॉरी. सकाळी सकाळी तुला उठवलं. ऐक ना रे. बाबांचा फोन आला होता. काय ग ?काही अर्जंट? अरे आईची तब्बेत बरी नाहीये. ऑपरेशन करायला लागेल. आणि रमेश तर तुला माहितीये डिलिव्हरीच्या मुळे त्याला पण येता येणार नाही. तुझं थोडसं काम लवकर होऊ शकेल का? म्हणजे मला इंडियात जाता येईल असं मी जरा बोलतो. माझ्या बॉसशी. आणि तुला एक दोन तासात कळवतो. हो नक्की कळव. होप सो काही तरी पॉझिटिव्ह कळव हो मी प्रयत्न तर करतो. झालं ठरल्या प्रमाणे मिलिंद चा दुपारी कॉल

आला. मनु सॉरी ग. खूप कन्व्हिन्स केलं या लोकांना ते म्हणतायत नाही, मी अशी अर्धवट कॉन्फरन्स सोडून जाऊ नाही शकत. काय करशील नेम? नाही रे मग मी आता बाबांना कळवते की मला नाही जमणार .

थोडे दिवस तुम्ही काहीतरी अॅडजस्ट करा. नंतर मग मी येतेच. हो बेटर तसच होईल. कळवुन टाकते त्यांना. बर ठीके अस म्हणून मी फोन ठेवला. पण मला मनातून खूप वाईट वाटत होतं. दोन्ही मूल्यांचा आज त्यांना काहीही उपयोग होत नव्हता. रमेशचा रिझन अगदी जेन्युइन होतं. माझं पण चेंज होऊ शकलं असतं. पण आयुष्यात काही वेळेला आपल्या प्रायोरिटी वेगळ्या असतात. मी थोडं मन घट्ट करून वडिलांना फोन लावला. हॅलो बाबा. बाबा सॉरी अहो मला आत्ता नाही येता येते कारण मिलिंद त्याचे बॉस सोडत नाहीयेत आणि मुलांना असं एकटं सोडून नाही होऊ शकत. तुम्ही मला समजून घ्या. अगं हो हो. काहीच प्रॉब्लेम नाही. आम्ही करू मॅनेज. काय वाटलं की हक्काची माणसं होती ना म्हणून तुम्हाला फोन लावला. मग नेहमी तर आम्ही करतच होतो किंवा करू मॅनेज. डोन्ट वरी बाबा, तुम्ही चिडला आहात ना? खरं सांगा ? नाही नाही ग चिडले मी . बरोबर आहे तुमच्या पण प्रायोरिटी वेगळ्या आहेत, आम्ही करून मॅनेज. पण बाबा मिलिंद आला रे आला की त्याच्या दुसऱ्यादिवशी मी येतेय तिथे. काहीच काळजी करू नका तुम्ही. मी आले ना की सगळी सूत्रं हाती घेईन आणि सगळं नीट होईल. हो ते बघू . चल आत्ता ठेवतो मी फोन जरा गडबडीत आहे . बाबांनी फोन ठेवून दिला. पण मी फोन ठेवल्यावर विचार करत बसले. मला बाबांचं ते वाक्य सारखं आठवत होतं

"आम्हाला तुमची गरज आहे, जमल्यास येशील का?" ठरल्याप्रमाणे आईचं ऑपरेशन झालं.

मी आणि रमेश सतत फोनवरून डॉक्टरांच्या संपर्कात होतो. डॉक्टरांनी कॉन्फरन्स कॉल करून आम्हाला सांगितलं. हे बघा, त्यांचं ऑपरेशन तर झालेलं आहे. पण ऑपरेशन नंतरची रिकव्हरी ही जास्त महत्त्वाची आहे. त्या त्यांच्या माणसांमध्ये असतील आणि त्यांना कुणी मदत करणार असेल तर त्या लवकर रिकव्हर होतील आणि लवकर चालायला लागतील. बघा प्रयत्न करून त्यांचं वय बघता तसं रिकव्हरी व्हायला वेळ लागेल. त्यामुळे त्यांना तसा बर्यापैकी वेळ द्यावा लागेल. आम्ही दोघेही म्हंटलं हो डॉक्टर आम्ही समजू शकतो. नेहमीसारखा मी सकाळी घरी फोन लावला. अचानक तिथून वेगळाच आवाज कानी पडला. हॅलो, हॅलो, कोण बोलतंय? मी लता आपण कोण ? हॅलो लता मी मिनू बोलतोय. हाय मिनू कशी आहेस? बरेच वर्षांनी आपण आवाज ऐकतो एकमेकांचा. हो ना. पण तू सकाळी सकाळी आमच्याकडे अरे तुला क्वीन बोलली नाही का? क्वीनच्या ऑपरेशनच्या आदल्या दिवसापासूनच मी तिकडे त्यांच्या बरोबर आहे. अरे क्वीन त्यांचा स्वभावच आहे तसा काही कुणाला सांगत नाही. बर थांब तुझे बाबा आलेत. बोल त्यांच्याशी. हॅलो बाबा ही काय करतीय इकडे? अग हळू हळू तिला ऐकायला जाईल. हो पण ती करतीये काय? तिचा काय संबंध? आणि ऑपरेशनच्या आदल्या दिवसापासून ती तुमच्याबरोबर आहे. मला बोललाच नाहीत काही. अग आम्ही इतक्या गडबडीत होतो. काय बोलणार तुला? पण काही म्हण लताची खूप मदत झाली

ग. तिला जसं कळलं की तिची क्वीन आजारी आहे. सगळी कामधाम सोडून ती हजर. मला म्हणाली, मी आता कुठेही हलणार नाहीये. तुम्हाला काय हवंय ती सगळी मदत करायला मी तयार आहे. अगं आम्हाला मदतच झाली तिची.

ओके मी थोड्याने फोन करते. असं म्हणून मी फोन ठेवला. ही लता कुठे आली इथे माझ्या डोक्यात नुसते प्रश्न. हिचा काय संबंध? कायमची सवय आहे तिला नको तिथे आणि नको त्या वेळी सगळीकडे लुडबुड करायची. बरं आता ही लता म्हणजे साधारण माझ्याच वयाची आईची ट्रेन मैत्रीण. मैत्रीण का मानसकन्या हे मला कधीच कळलं नाही. त्यांचं इक्वेशन काय आहे हे मला कधी कळलंच नाही. आत्तापर्यंत मला त्याचं उत्तरच मिळालं नाही. पण काही म्हणा, मला ही लता अज्जिबात आवडायची नाही. माझ्या आईला क्वीन वगैरे काय म्हणते. बर माझी आई पण अशी तिला हक्काची मुलं असताना सगळ्या गोष्टी त्या लता बरोबर शेयर करायच्या. काहीही झालं की लता असं म्हणत होती. मी तर लताला असंच सांगणार आहे. लता ,लता, आणि लता आयुष्यात दुसरं काही नाहीच. का? मला फार राग येत होता. काय करणार? इतक्यात मिलिंद आला. मिलिंद माझा चेहरा बघून म्हणाला, काय झालं काय मॅडम? आईचं ऑपरेशन तर व्यवस्थित झालं ना? अरे हो सगळं व्यवस्थित झालं. अरे तुला ती लता माहित आहे ना? मी तुला सांगितलेलं. अरे ती आली आहे रे तिथे. आणि मी आता यांना फोन करून सांगणार की मी येतीये. आता ती कशाला हवी तिथे? अग शांत हो. तू जा तिथे आणि तू गेल्यावर ती जाईलच. तू कशाला एवढं टेन्शन घेतेय. तू जा. तिकीट काढलंच आहे. परवाची फ्लाईट आहे. बाबांना जनरल कानावर घालून ठेव की तू येतेस आणि हवे तेवढे दिवस राहा काही प्रॉब्लेम नाही.

आमची काळजी करू नकोस. इथे मी आणि मुलं सगळं सेट करू. रमेशला पण सांग. हो तसंच करते. बाबांना फोन लावला. हॅलो. बाबा मी परवा येतीये. दुपारची फ्लाईट आहे. ड्रायव्हरला गाडी घेऊन यायला सांगा म्हणजे माझी गडबड होणार नाही. हो तू काही काळजी करू नकोस. ये आल्यावर भेटूच. ठरल्याप्रमाणे मी भारतात गेले. एअरपोर्ट वर बघते तर काय ड्रायव्हर बरोबर लता आलेली मला बघून एकदम कडकडून मिठी मारली. हॅलो  कशी आहेस? बारीक झाली आहेस. एकदम डाएट वगैरे जोरदार दिसतंय. मिलिंद ने सांगितलं की काय ? नाही ग वाटतेय का तुला मी बारीक असेल मग. मला असा राग आलेला प्रसंग काय? आणि ही बाई बोलतीय काय? हिला माझा बारीक पणा दिसतोय आणि माझ्या आईच काहीच सांगत नाहीये. मीच म्हंटलं आई कशी आहे? अरे क्वीन ना. शेवटी क्वीन आहे  ग ती.  फिट्टच आहे ती  काही झालं नव्हतं तिला. चल आपण घरी जाऊन बोलूया. दमली असशील ना? असं म्हणून आम्ही घरी आलो. घरी आल्या आल्या मी पहिले  आईला भेटले कडकडून मिठी मारली आईला. आई कशी आहेस ग? मी येऊ शकले नाही ग. जेव्हा तुला गरज होती तेव्हा खरंच नाही येऊ शकले. अगं ठीक आहे . आता  मी बारी होत हळू हळू चालायला पण लागेन. लताने खूप काळजी घेतली आमची. खूप केलय आमच्यासाठी. मनामध्ये मला परत राग येतच होता. आईचं अजून लता पुराण काही संपत नव्हतं. दमल्यामुळे मी जरा आराम केला. सकाळी उठले. पाहते तर काय? लता मावशी कडून सगळी कामे करून घेत होती. त्यांना सांगत होती. हे करा. ते करा अगदी घरातले लोक पण करणार नाहीत एवढं.

मनापासून ती सगळं त्या मावशींना सांगून त्यांच्या कडून करून घेत होती. नंतर आईची पण खूप सेवा करत होती. अगदी स्वतःच्या आई असल्यासारखे. पाहून मला थोडी जळजळ झाली. पण खंत पण वाटत होती की अरे हे आपण करायला पाहिजे होतं आणि तेव्हा आपण यांच्या बरोबर नव्हतो. भारतात यायच्या आधी मी मनात ठरवलेलं होतं की गेल्या गेल्या त्या लताला सांगीन. आता मी आले आहे. तू जा तिची सख्खी मुलगी आहे  तिच्याबरोबर तुमची काही गरज नाहीये  तिची मुलं समर्थ आहेत तिला बघायला. पण माझी हिंमतच झाली नाही. कारण मी इथे येऊन जे बघत होते ते बघून मी खूपच आश्चर्यचकित झाले. आई लताचे  कौतुक करत होती. पण खरंच ते करण्या सारखच ती काम करत होती. जस जसे दिवस जात होते तस तस मी लताला नीट समजुन घेत होते आणि मला खरच ती आता पुर्णपणे समजली होती. माझा खूप गैरसमज होता पूर्वी पासुन की नाती ही फक्त रक्ताची च असतात आणि ती जास्त महत्वाची असतात. मला फार अभिमान वाटायचा की माझ्या आईला हक्काची दोन मुलं आहेत आणि ते आम्ही कायम तिच्या बरोबर सतत असणार याचा. पण खरच तिला जेव्हा गरज होती तेव्हा आमच्या आयुष्यातल्या प्रायोरिटी वेगळया होत्या. नाही देऊ शकलो आणि नाही मदत करू शकलो. पण ह्या लता सारख्या काहीच नातेसंबंध नसताना निस्वार्थी पणे ह्या बाईने येऊन आपल्या आई वडिलांसाठी किती काम केलं ह्याचे उदाहरण मी कधीच विसरु शकत नव्हते. आणि ह्या लता कडून ह्या गोष्टी घेण्यासारख्या होत्या. आज मी ठरवलं.

लताला काहीही झालं तरी थँक्यू म्हणायचं. नेहमीसारखा आम्ही सकाळी चहा घेत बसलेलो. लताला मी म्हटलं, लता थँक्यू आणि खूप सॉरी ग. लता म्हणाली. सॉरी सॉरी कशासाठी? तुला आठवत नसेल. पण मला चांगलं आठवतंय. मी तुला एकदा फोन करून वाट्टेल ते बोलले होते. लता हसायला लागली. हो का केलंस खरा फोन. पण काय बोलली होतीस हे काही माझ्या लक्षात नाही. पण माझ्या आहे ना चांगलं लक्षात. मी तुला बोलले होते की तू आमच्या आईपासून दूर राहा. तुझा तिच्याशी काहीही संबंध नाही. ती आमची आई आहे. तिला हक्काची दोन मुलं आहेत जी जगाच्या पाठीवर ती कुठेही असली तरी ते धावत येतील आणि तुझा आमचा काहीही संबंध नाहीये. तू का आमच्या आयुष्यात लुडबुड करतेस? असं मी तुला खूप बोलले होते. हो मला आठवतय. पण ठीक आहे . तेव्हा तुला तसं वाटत होतं म्हणून तू बोललीस. हो ग. पण सॉरी. माझा खूप मोठा गैरसमज झाला होता ग की फक्त रक्ताची नाती श्रेष्ठ असतात असा. पण तुझं आणि आईचे  रिलेशन बघून मला आता अगदी चांगलं पटलंय की मनाची नाती पण श्रेष्ठ असतात आणि खूप घट्ट पण असतात अगदी जवळची नाती. हो खरचं ते. एक  सांगु का? अग असं नात्यांना  नाव द्यायची गरजच नसते आणि ते रक्ताचं नातं आहे का  रक्ताचं नाहीये ते महत्वाचे नाही . मनातील आदर आपुलकी खूप गरजेची आहे आणि हेच शिकलेय मी तुझ्या आई कडून. बरोबर आहे लता  खरंच तू खूप ग्रेट आहेस. तुझ्यामुळे मला नात्यांचा नवा अर्थ समजला.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं.

वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237